७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. २२ जून २०२६


www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये


# आला रे आला : पुण्यात मुसळधार पाऊस

## कोकणात पावसाची संततधार; साताऱ्यातही बरसला, बळीराजाला दिलासा

मुंबई (दै. संध्या)



उन्हाळा संपला, सुट्ट्या संपून शाळाही सुरू झाल्या आहेत, जून महिना अखेरच्या आठवड्याकडे जातोय, पण अद्यापही पावसाने रिपरिप केली नसल्यानं सर्वजण चिंतेत आहेत. शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांसह पशू-पक्षीही पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहात आहेत. हवामान वेधशाळेचे अंदाज पुढे पुढे जात आहे. आता, 25 जूननंतर राज्यात मान्सूनचे जोरदार आगमन होईल, असा अंदाज आहे. पुणे, मुंबईतील काही भागात, भिवंडी, सातारा आणि कोकणातही पावसाने हजेरी लावली. त्यामुळे, नागरिकांमध्ये काहीसे समाधान पाहायला मिळत आहे.

पुणे शहरात आज दुपारपासून ढगाळ वातावरण होतं, आता मागील वीस मिनिटांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. पुणे शहरातील हडपसर, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा, कोथरूड या सर्वच भागांमध्ये आज दुपारी 4 वाजताच्या सुमारास पावसाने जोरदार हजेरी लावली. गेले काही दिवस पुण्यामध्ये चांगलाच उकाडा जाणवत होता, आता जोरदार पाऊस सुरू असल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, पहिल्याच एका पावसात स्वारगेट येथील मित्र मंडळ चौकाला तलावाचे स्वरूप आल्याने पादचारी मार्ग पाण्याखाली गेल्याचं दिसून आलं. तर, पिंपरी चिंचवडच्या काही भागातही पावसाने हजेरी लावली. मात्र, अद्यापही हलक्या सरी कोसळत आहेत, अद्याप पावसाने जोर धरलेला नाही. मोसमी पावसाची शहरवासीयांना प्रतिक्षा आहे.

पुण्यासह सातारा, मुंबई आणि कोकणातही पावसाची रिमझिम पाहायला मिळाली. सातारा जिल्ह्याच्या पश्चिम ग्रामीण भागात ढगांच्या गडगडाटासह आणि विजांच्या कडकडाटात पावसाने दमदार एन्ट्री केली आहे. साताऱ्यातील परळी खोऱ्यामध्ये पावसाने तुफान बॅटिंग केली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. पावसाअभावी रखडलेल्या शेतीच्या मशागतीच्या कामांना आता वेग येणार आहे. पेरणीपूर्व तयारीसाठी सज्ज असलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे मोठा आधार मिळाला आहे. मुसळधार पडलेल्या पावसामुळे बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून तीव्र उकाडा आणि वाढलेल्या तापमानामुळे हैराण झालेल्या भिवंडीकरांना अखेर पावसाने काही प्रमाणात दिलासा दिला. शहरात रविवारी अचानक पावसाच्या सरी कोसळल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला, आणि नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. मात्र, पावसाचे आगमन अचानक झाल्याने बाजारपेठा, मुख्य रस्ते आणि चौकांमध्ये नागरिकांची एकच धावपळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पाऊस सुरू होताच अनेकांनी दुकाने, शेड आणि इमारतींचा आसरा घेतला, तर काही नागरिकांनी छत्र्यांचा आधार घेत आपापल्या कामासाठी मार्गक्रमण केले. दरम्यान, अनेक तरुण आणि लहान मुलांनी पहिल्या पावसाचा मनमुराद आनंद घेत पावसात भिजण्याचा आनंद लुटला. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणमध्येही पावसाची रिपरिप पाहायला मिळाली, तब्बल दहा ते पंधरा दिवसाच्या प्रतिक्षेनंतर चिपळूणमध्ये पावसाने हजेरी लावली. विजांच्या कडकडाटासह चिपळूण मध्ये पावसाचे आगमन झाले असून पावसाअभावी धोक्यात आलेल्या भात पिकांना संजीवनी मिळाल्याने शेतकऱ्यासाठी मोठा दिलासा म्हणता येईल. तर, कडाक्याच्या उन्हामुळे प्रचंड त्रस्त झालेले नागरिक पावसाच्या आगमनामुळे सुखावले आहेत.

## Y+ सुरक्षा घेतली याचा अर्थ लोकांचा तुमच्यावर राग : सुषमा अंधारे


मुंबई (दै. संध्या)



ओमराजे निंबाळकरांना 20 वर्ष न्यायचा लढा दिला पण त्यांना न्याय मिळाला नाही. अनेक काही गोष्टी घडल्या असतील, मांडणी कमी पडली असेल. त्यांच्यासोबत आमच्या भावना आणि सद्भावना आहेत असे मत ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी व्यक्त केले. ओमराजे यांनी दिल्लीला जाण्यापूर्वी मेळावा घ्यायला पाहिजे होता. आता जाऊन आले, सह्या दिल्या हा मेळावा आधी घ्यायला पाहिजे होता असे अंधारे म्हणाल्या. त्यांची मानसिक अस्थिरता आहे. Y+ सुरक्षा घेतली याचा अर्थ तुमच्यावर लोकांचा राग आहे. लोक चिडले आहेत, ओमराजे हा चक्रव्यूह कसा भेदणार? असा सवाल अंधारेंनी केला. नागेश आष्टीकर यांच्या सारख्या लोकांची आर्थिक कोंडी झाली आहे. निधीबाबत राजाभाऊ, अरविंद सावंत अनेक काँग्रेस आमदार खासदार यांचे सुद्धा मत आहे. औंढा नागनाथ स्मरून तुम्हाला वाटते का? दिल्लीत झालेल्या बैठकीत कोण कोण होतं हे आम्हाला माहिती आहे. 10 तारखेला झालेल्या बैठकीनंतर ताजमध्ये 6 जणांची बैठक झाली याचे सगळे व्हिडिओ आहेत. आष्टीकर यांनी दिलेली कारणे तकलादू आहेत. मान मिळत नव्हता मग उमेदवारी कशी मिळाली? असा सवाल अंधारे यांनी केला. मला धमक्या येतायेत, याबाबत मी पोलिसात तक्रार दिली आहे. लोकसभा सभापती यांच्यासोबत बसलेले, हॉटेलमध्ये झालेल्या बैठकीचे व्हिडिओ असल्याची माहिती सुषमा अंधारे यानी दिली आहे. 4 महिन्यापासून हा निर्णय शिजत होता असे ही त्या म्हणाल्या.

## टीम इंडियात मोठे फेरबदल; मागील मालिकेतील ६ धुरंधर खेळाडू बाहेर

मुंबई (दै. संध्या)



भारतीय संघाच्या आगामी इंग्लंड दौऱ्याला पुढील महिन्यापासून म्हणजेच 1 जुलैपासून सुरुवात होत आहे. या दौऱ्यात सुरुवातीला 5 सामन्यांची टी-20 मालिका खेळवली जाईल, ज्यानंतर 14, 16 आणि 19 जुलै रोजी 3 सामन्यांची एकदिवसीय मालिका रंगणार आहे. या अत्यंत महत्त्वाच्या वनडे मालिकेसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली असून, गेल्या मालिकेच्या तुलनेत संघात मोठे फेरबदल पाहायला मिळत आहेत. फेब्रुवारी 2025 मध्ये भारतामध्ये झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या वनडे मालिकेच्या तुलनेत यंदाच्या संघातून तब्बल 6 दिग्गज खेळाडूंना डच्चू देण्यात आला आहे. यामध्ये यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, हार्दिक पांड्या, मोहम्मद शमी, वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजा या स्टार खेळाडूंचा समावेश आहे. निवड समितीचा सर्वात धक्कादायक निर्णय युवा फलंदाज यशस्वी जैस्वालबाबत राहिला. अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात शानदार शतक झळकावूनही त्याला इंग्लंड दौऱ्यासाठी संघात स्थान मिळालेले नाही. दुखापतग्रस्त विराट कोहलीचा पर्याय म्हणून जयस्वालला अफगाणिस्तानविरुद्ध संधी मिळाली होती, मात्र आता विराटच्या पुनरागमनामुळे यशस्वीला संघाबाहेर जावे लागले आहे. जैस्वालसोबतच युवा फिरकीपटू हर्ष दुबे आणि वेगवान गोलंदाज प्रिन्स यादव यांनाही संघात स्थान टिकवता आले नाही. अफगाणिस्तानविरुद्ध छाप पाडणाऱ्या या खेळाडूंपेक्षा सिलेक्टर्सनी अनुभवी खेळाडूंना प्राधान्य दिले आहे. इंग्लंडविरुद्धच्या या दौऱ्यासाठी अनुभवी फलंदाज विराट कोहली आणि मुख्य वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यांचे संघात पुनरागमन झाले आहे. तसेच, 2027 च्या वनडे वर्ल्ड कपच्या दृष्टीने अक्षर पटेलला पुन्हा संघात बोलावण्यात आले आहे. तरुण गोलंदाज हर्षित राणा आणि गुरनूर ब्रार यांनी आपले स्थान कायम राखले आहे, तर शुभमन गिलकडे संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे.

# ठाकरेंचा फुटलेला खासदार पहिल्यांदाच मीडियासमोर

## नागेश पाटील आष्टीकरांनी सांगितलं शिवसेना सोडण्याचं राज'कारण'

मुंबई (दै. संध्या)





ठाकरेंच्या शिवसेनेतील 6 खासदारांनी आपला स्वतंत्र गट स्थापन केला असून ओमराजे निंबाळकर यांच्यासह हिंगोलीतील खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनीही ठाकरेंची साथ सोडत शिंदे गटात गेल्याचं स्पष्ट झालं आहे. कारण, स्वत: नागेश पाटील आष्टीकर यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून आपली भूमिका मांडली असून मी दुसरीकडे कुठेही गेलो नाही, शिवसेनेतून शिवसेनेतच गेलोय, असे आष्टीकर यांनी सांगितले. त्यामुळे, पहिल्यांदाच ठाकरे गटातील फुटलेल्या 6 खासदारांपैकी एका खासदाराने समोर येऊन आपली भूमिका मांडली. सत्तेत असल्याशिवाय कामे होत नव्हती, म्हणूनच मी हा निर्णय घेतल्याचं आष्टीकर यांनी म्हटलं. तसेच, कार्यकर्त्यांना त्यांनी महत्त्वाचं आवाहन देखील केलंय.

नागेश पाटील आष्टीकर यांनी आज आपली भूमिका परखडपणे मांडली. आम्ही 18 जूनपर्यंत कुठेही गेलो नव्हतो, मात्र शिवसेना वर्धापन दिनाच्या मेळाव्यात आमच्यावर बोचऱ्या शब्दात टीका करण्यात आली, त्याने आमची मनं दुखावली. पण, खरं सांगायचं तर आपण पाहतोय गेल्या अनेक दिवसांपासून सत्तेशिवाय कुठलेही कामे होत नाहीत. मी जे काही पाऊल उचललं, ते लोकांनी मला ज्या आशेनं खासदार म्हणून निवडून दिलंय, ती त्यांची कामे पूर्ण करायची म्हणून. सत्तेत असल्याशिवाय लोकांची ही कामे होत नव्हती. अनेकांना माझी भूमिका पटली नसेल, काहींना पटलीही असेल. मी तुम्हाला म्हटल्याप्रमाणे, मला तुमच्याकडे सालानं ठेवा, मी तुमचं साल नेकीनं करेन. माझ्यावर तुम्ही जी जबाबदारी ठेवलीय, ती जबाबदारी निश्चितपणे पार पाडेल, असे नागेश पाटील आष्टीकर यांनी म्हटले.

मी माझ्या कामातून नाराज कार्यकर्त्यांना दाखवून देईल, मी दुसरं कुठेही गेलो नाही, शिवसेनेतून शिवसेनेतच गेलोय, मी विचारधारा सोडलेली नाही, असेही आष्टीकरांनी कार्यकर्त्यांना सांगितले. कृपया कुणीही असंवैधानिक बोलू नका, राग व्यक्त करा पण असंवैधानिकपणे बोलू नका, शब्द मनाला खूप लागतात. कारण, आपल्याच गावच्या बाभळी आणि आपल्याच गावच्या बोरी.. असे म्हणत मी कार्यकर्त्यांसोबत कायम असेल, असेही आष्टीकर यांनी म्हटले.

संजय राऊत साहेब म्हणाले की, झोडून काढ, हरकत नाही ते माझ्या वडिलांसारखे आहेत, त्यांनी बोलायला हरकत नाही. मात्र, झोडून काढू म्हटले तरी कोणीही कोणाला कमी नसतं, मात्र त्याचे परिणाम वाईट होतात, असेही नागेश पाटील आष्टीकर यांनी म्हटलं.

शिवसेना ठाकरे गटामध्ये मोठी फूट पडली आहे, शिवसेना ठाकरे गटाच्या 9 पैकी 6 खासदारांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली आहे. हा उद्धव ठाकरेंसाठी मोठा धक्का मानला जात आहे. हे सर्व खासदार शिवसेना शिंदे गटात सहभागी होणार असल्याचं जवळपास निश्चित झालं आहे. मात्र त्यानंतर आता धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे शिवसेना शिंदे गटाचं टेन्शन वाढलं आहे. आपण अजून कोणताही निर्णय घेतलेला नाही, मी मतदारसंघात जाऊन कार्यकर्त्यांशी चर्चा करेल आणि मग निर्णय घेईल अशी भूमिका ओमराजे निंबाळकर यांनी घेतली आहे, त्यातच त्यांचं शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी देखील फोनवर बोलणं झालं आहे, सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सोमवारी ओमराजे निंबाळकर उद्धव ठाकरे यांची भेट घेण्याची शक्यता आहे, त्यामुळे शिवसेना शिंदे गटाचं टेन्शन वाढलं आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com


ढिंग-टांग




## महाविकास आघाडीची मागणी; विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

# सरकारची कर्जमाफी फसवी, ७/१२ कोरा करा

मुंबई (दै. संध्या)



राज्य सरकारच्या अपयशी कारभाराविरोधात आणि जनतेच्या प्रश्नांबाबत सरकारच्या असंवेदनशील भूमिकेचा निषेध म्हणून महाविकास आघाडीने विधानमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्याची घोषणा आज पत्रकार परिषदेत करण्यात आली. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी राज्यातील गंभीर प्रश्नांकडे सरकारचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. राज्यात दुष्काळ,शेतकरी प्रश्न, महिलांवरील वाढते अत्याचार, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था, वाढते अमली पदार्थांचे जाळे यांसारख्या अनेक प्रश्नांवर सरकारकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याची टीका महाविकास आघाडीने केली.

राज्यावर दुष्काळाचे संकट आहे. पेरण्या लांबल्या आहेत, शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहे. सरकारने सुका दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शिवसेनेचे गटनेते भास्कर जाधव यांनी पत्रकार परिषदेत केली. सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यात शेतकऱ्यांना अटी शर्तीमध्ये अडकवण्यात आले आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करावा अशी मागणी महाविकास आघाडीने यावेळी केली. विधान परिषदेचे काँग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी, हे सरकार 56 टक्के कमिशन सरकार असल्याची टीका केली. राज्यात कंत्राटदारांनी अधिवेशन घेऊन कामांची बिले मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कमिशन द्यावे लागत असल्याचे सांगितले. कंत्राटदारांची तब्बल एक लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित आहेत. जल जीवन मिशनच्या निधीत कपात झाली असून अनेक विकासकामे रखडली आहेत. दुसरीकडे राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे अशी टीका सतेज पाटील यांनी केली.

राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील म्हणाले राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे. महिलांवर अत्याचार वाढले आहे. ड्रग्सचे प्रमाण राज्यात प्रचंड वाढले आहे. अशा प्रकरणात छोट्या लोकांना अटक होते. पण मास्टर माईंड मात्र मोकाट असतात. अमली पदार्थ विकणारे आणि पोलिसांचे हितसंबंध आहेत यातून या घटना वाढत आहे. देवस्थानच्या जमिनीचा घोटाळा मागील अधिवेशनात मांडला. पण काही कारवाई नाही अशी टीका जयंत पाटील यांनी केली. सरकार विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी केवळ टिंगल-टवाळी करत आहे. विरोधकांनी दिलेल्या पत्रातील व्याकरणावर भाष्य करण्यापेक्षा त्यातील प्रत्येक मुद्द्यांवर उत्तर देण्याची जबाबदारी सरकारची आहे, अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली.

जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची तयारी नसलेल्या सरकारसोबत औपचारिक चहापानाला उपस्थित राहणे योग्य नसल्याने महाविकास आघाडीने या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. राज्यातील 13 कोटी जनतेच्या हिताचे प्रश्न सोडविणे हे सरकारचे कर्तव्य असून पावसाळी अधिवेशनात हे सर्व मुद्दे महाविकास आघाडी आक्रमकपणे मांडणार असल्याची भूमिका महाविकास आघाडीने आज पत्रकार परिषदेत मांडली.

# महाराष्ट्राच्या समाजवादी चळवळीचा चेहरा हरपला!

## ज्येष्ठ नेते शिवाजीराव शिंदे यांचे निधन, राज्यसभेची संधी धुडकावत किंगमेकरच्या भूमिकेत

लातूर (दै. संध्या)



महाराष्ट्रातील पुरोगामी आणि समाजवादी चळवळीतील एक अभ्यासू, लढाऊ आणि निःस्वार्थी विचारवंत अशी ओळख असलेले ज्येष्ठ नेते शिवाजीराव शिंदे यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने लक्षावधी कष्टकरी, शेतकरी आणि वंचितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारा एक बुलंद आवाज शांत झाला आहे. त्यांच्या जाण्याने केवळ लातूर जिल्ह्याचीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली असून सर्वपक्षीय नेत्यांकडून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात १९४६ मध्ये शिवाजीराव शिंदे यांचा जन्म झाला. ग्रामीण भागात वाढलेल्या शिवाजीरावांनी विद्यार्थी दशेपासूनच अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली आणि समाजवादी विचारसरणीचा स्वीकार केला. महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीचे आधारस्तंभ प्रा. ना. य. डोळे, डॉ. बाबा आढाव, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे आणि भाई वैद्य यांच्यासारख्या दिग्गजांच्या थेट मार्गदर्शनाखाली त्यांनी सामाजिक आणि राजकीय कार्यात स्वतःला झोकून दिले होते. शिवाजीराव शिंदे यांनी जनता दलाचे राज्य सरचिटणीस म्हणून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आणि पक्षसंघटना तळागाळापर्यंत मजबूत केली. त्यांच्यातील अफाट संघटन कौशल्यामुळेच राष्ट्रीय पातळीवरही त्यांची मोठी ओळख निर्माण झाली होती.

माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांनी काढलेल्या प्रसिद्ध 'दिल्ली ते कन्याकुमारी' भारत पदयात्रेच्या मुख्य व्यवस्थापनाची अत्यंत महत्त्वाची आणि जबाबदारीची भूमिका त्यांनी यशस्वीपणे सांभाळली होती.

डॉ. बाबा आढाव यांच्या 'एक गाव एक पाणवठा' या क्रांतीकारी चळवळीत त्यांनी अग्रभागी राहून काम केले. यासोबतच दलित, आदिवासी आणि उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. १९९५ मध्ये लातूर जिल्हा जनता दलाचे अध्यक्ष असताना त्यांनी पक्षाला जिल्ह्यात ऐतिहासिक यश मिळवून दिले होते. शिवाजीराव शिंदे यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांना अनेकदा राज्यसभा, विधानसभा किंवा विधानपरिषदेवर जाण्याच्या थेट संधी उपलब्ध झाल्या होत्या. मात्र, वैयक्तिक सत्तेचा व पदांचा मोह टाळत त्यांनी नेहमीच आपल्या सामान्य कार्यकर्त्यांना पुढे केले आणि त्यांना आमदार-खासदार बनवले. याच निस्पृह वृत्तीमुळे राजकारणात त्यांची ओळख 'किंगमेकर' म्हणून दृढ झाली होती. त्यांच्या या निगर्वी आणि अभ्यासू स्वभावामुळेच माजी पंतप्रधान चंद्रशेखर, जॉर्ज फर्नांडिस यांच्यासह भाजपचे दिवंगत नेते प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख अशा महाराष्ट्रातील सर्वच बड्या नेत्यांशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे आणि कौटुंबिक संबंध होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीतील एक आदर्श पर्व संपले आहे.

## संपादकीय

# पाऊस लांबला, पिकांचा पॅटर्न बदलायला हवा

जूनचा चौथा आठवडा सुरू होत आहे; मात्र, कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग तसेच राज्यातील एक-दोन जिल्हेवगळता उर्वरित महाराष्ट्रात अजून पावसाचे आगमन झालेले नाही. त्यामुळे उष्णतेचा दाह वाढला आहे. हवामानाचा अंदाज वर्तविणाऱ्या जगभरातील वेगवेगळ्या संस्थांनी आशिया खंडात एल निनोमुळे कमी पावसाचा अंदाज वर्तविला आहे. भारतीय हवामान शास्त्र विभागाने सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा पहिला अंदाज वर्तविला होता. दुसरा अंदाज सरासरीच्या ९० टक्के पावसाचा होता. त्यात ५ टक्के कमी-अधिक असतात, म्हणजे ८५ टक्क्यांपर्यंतही पाऊस होऊ शकतो. ही पाण्याच्या गंभीर संकटाची स्थिती आहे. आशिया खंडातील काही देशांसाठी हे दुष्काळी वर्ष ठरू शकते, असे काही आंतरराष्ट्रीय संस्थांचे म्हणणे आहे. एल निनोचा प्रभाव, जगभरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड ही यामागील प्रमुख कारणे आहेत. कार्बन डायऑक्साईडची पातळी वाढली आहे. त्यातून जागतिक पातळीवर १.५ अंश सेल्सिअस तापमान वाढले आहे. हे सर्व घटक शेतीसाठी धोकादायक आहेत. हवामान बदलाने अनियमित पाऊस, पावसाचे दिवस कमी-अधिक होणे, गारपीट होणे अशी संकटे येतात. त्यातून पिकांचे मोठे नुकसान होते. अंदमानात वेळेपूर्वी आलेल्या पावसाला पुढे गती मिळाली नाही. केरळात त्यामुळे तो उशिरा दाखल झाला. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मान्सून दाखल झाला आहे. मात्र, सध्या तेथे पाऊस उघडला आहे. पावसाचा हा खंड सुरू झाला आहे, तो मी वर्तविला होता. राज्यातील इतर भागांत पाऊस पडलेला नाही. आता आपण सर्व मान्सूनचे पुनरुज्जीवन (रिव्हायवल ऑफ मान्सून) होण्याची वाट पाहत आहोत. आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी पशुपालकांनी सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे. त्यामुळे फेब्रुवारी ते जून २०२७ या टंचाईच्या काळात त्याचा वापर करता येईल. मी मागील दोन दशकांपासून कृषी हवामानाचा अंदाज वर्तवित आहे. विदर्भातील चार, मराठवाड्यातील एक, पश्चिम महाराष्ट्रातील सहा, उत्तर महाराष्ट्रातील तीन आणि कोकणातील एक अशा १५ हवामान केंद्रांवरील नोंदीचे विश्लेषण करून यावर्षीचा अंदाज मी १ जूनला दिला. त्यात नागपूर, यवतमाळ, पुणे आणि दापोली या केंद्रांवर चांगला पाऊस अपेक्षित आहे. दोन ते तीन ठिकाणी कमी पाऊस आहे, त्यात धुळे केंद्राचा समावेश आहे. मी सरासरीच्या ९८ टक्के पावसाचा अंदाज दिला आहे. त्यात ५ टक्के 'मॉडेल एरर' असतो, म्हणजे ९३ टक्के पाऊस होऊ शकतो, असा अंदाज दिला. हा पाऊस म्हणजे दुष्काळी वर्ष असू शकते. मात्र, आयओडी हा घटक सकारात्मक झाल्यास पावसाची तेवढी गंभीर स्थिती राहणार नसल्याचे भाकीत जपान व फिलिपिन्स या देशांतील हवामान शास्त्र संस्थांनी नुकतेच वर्तविले आहेत. हे निश्चितच सकारात्मक आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाण सौम्य होईल.



हलकी जमीन : उथळ जमीन अर्थात ६ इंच खोल जमिनीत मूग, उडिद, मटकी, चवळी ही पिके घ्यावीत. ही ८० ते १०० दिवसांची पिके आहेत.

मध्यम खोल जमीन : सोयाबीनचे पीक घेता येईल. बाजरी अधिक तूर ही पिके घेता येतील. खरीप ज्वारीचे पीकही फायदेशीर आहे. तृणधान्यांमुळे जनावरांना चारा आणि आपल्यालाही खाण्यासाठी धान्य मिळेल.

अतिखोल जमीन : कापसाचे पीक घेता येईल.

बागायती क्षेत्र : भाजीपाला, कांदा घेता येईल. मात्र, चांगला पाऊस झाल्यानंतर त्याचा निर्णय घेता येईल.

## संस्कृत सुभाषित

मृत्तिकानां सहस्त्रेण चोदकानां शतेन च।
न शुद्ध्यति दुराचारो भावोपहतचेतन:।।
ज्याचे चित्त दुष्ट भावनांनी, विकारांनी भरलेले आहे असा दुराचारी हजार प्रकारची माती अंगाला फासून, तीर्थांत आंघोळ करून, शेकडो नद्यांत डुंबूनही शुद्ध होत नाही.

## आगामी साप्ताहिकी

२२ जून २०२६ सोमवार
दुर्गाष्टमी
भारतीय आषाढ मासारंभ
सूर्याचा आर्द्रा नक्षत्रप्रवेश वाहन:गाढव
तुकामाय पुण्यतिथी– येहेळेगाव (हिंगोळी)
अयन करिदिन

२३ जून २०२६ मंगळवार
शुभ दिवस

२४ जून २०२६ बुधवार
शुभ दिवस

२५ जून २०२६ गुरुवार
निर्जला एकादशई

२६ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
छत्रपती शाहू महाराज जयंती
मोहरम (ताजिया)
धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती (तिथीप्रमाणे )

२७ जून २०२६ शनिवार
शनिप्रदोष
वटसावित्री व्रतारंभ
शिवराज शख ३५३ प्रारंभ
शिवराज्याभिषेकोत्सव दिन

२८ जून २०२६ रविवार
पौर्णिमा प्रारंभ
उ. रात्रौ ३.०६

## उपदेशकथा

### चणे खावे लोखंडाचे

पूर्वी कुंदगोळला पाण्याचे फार हाल असत. अर्धा एक मैल अंतरावर असलेल्या तळ्यातून छोटा भीमसेन दोन मोठ्या घागरी पाण्याने भरे आणि खांद्यावरून गुरुगृही आणी. केर काढणे, कपबशा धुणे, घर झाडणे, गुरुजींचे कपडे धुणे वगैरे कष्टाची सर्व कामे तो आनंदाने करी. वर्ष–दीड वर्षानंतर सवाई गंधर्वांच्या लक्षात आलं की, भीमसेन हा चिवट विद्यार्थी आहे. एकदा सवाई गंधर्वांची तब्येत बरी नव्हती. त्यांच्या छातीत दुखत होतं म्हणून ते छाती शेकत बसले होते. एकदम त्यांच्या कपड्यांनी पेट घेतला. जवळच असलेल्या भीमसेनच्या ते लक्षात आलं. तो एकदम तीरासारखा पुढं धावला. मागचा पुढचा विचार न करता दोन्ही पंजात पेटलेलं वस्त्र चुरगळून अग्नी जागच्या जागी विझवला. त्याच्या हाताला थोडंसं भाजलं पण केवढा अपघात टळला. सवाई गंधर्वांनी त्याला उदारहस्ते संगीताची विद्या दिली.

कथा उपदेश : गुरुसेवेचे फळ मिळतेच.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:व्यतीपात १०:३०:२७ |
| २२ जून २०२६ | करण:बव १५:४०:१५ |
| सोमवार | करण:बालव |
| विक्रम संवत्– २०८२ | २८:०५:२८+ |
| निज ज्येष्ठ शके | सूर्य:मिथुन |
| संवत्– १९४८ | चन्द्र:कन्या |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – मोहरम |
| मास– निज ज्येष्ठ | तारीख – ६ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | विशेष |
| शुक्ल पक्ष | दुर्गाष्टमी |
| तिथि:अष्टमी १५:४०:१५ | भारतीय आषाढ मासारंभ |
| नक्षत्र:उत्तराफाल्गुनी | सूर्याचा आर्द्रा नक्षत्रप्रवेश |
| १०:२२:०२ | वाहन:गाढव |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 6 | 4 | | 8 | 3 | | 9 | |
| 8 | | | 4 | 6 | | 5 | | 7 |
| 2 | 3 | | | 1 | | 6 | | |
| | | | 6 | | | | | |
| 3 | | | | 9 | | | | 1 |
| | | | | | 1 | | | |
| | | 2 | | 4 | | | 7 | 8 |
| 4 | | 1 | | 3 | 7 | | | 6 |
| | 8 | | 5 | 2 | | 4 | 1 | 9 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९८७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 8 | 6 | 1 | 3 | 2 | 4 | 5 | 7 |
| 4 | 2 | 5 | 7 | 9 | 6 | 3 | 8 | 1 |
| 1 | 3 | 7 | 8 | 5 | 4 | 9 | 6 | 2 |
| 3 | 5 | 9 | 6 | 1 | 7 | 2 | 4 | 8 |
| 7 | 4 | 8 | 9 | 2 | 5 | 6 | 1 | 3 |
| 6 | 1 | 2 | 3 | 4 | 8 | 7 | 9 | 5 |
| 2 | 9 | 3 | 4 | 8 | 1 | 5 | 7 | 6 |
| 5 | 7 | 1 | 2 | 6 | 9 | 8 | 3 | 4 |
| 8 | 6 | 4 | 5 | 7 | 3 | 1 | 2 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०२१७ – इजिप्तच्या टॉलेमी चौथ्याच्या सैन्याने अँटियोकस तिसऱ्याचा पराभव केला.
- ०१६८ – लुसियस एमिलियस पॉलसच्या नेतृत्त्वाखाली रोमन सैन्याने मेसिडोनियाच्या पर्स्युसचा पराभव केला.
- १६३३ – पोपच्या दबावाखाली गॅलिलियोने कबूल केले की पृथ्वीच सूर्यमालेचा केन्द्रबिंदू आहे, सूर्य नव्हे.
- १८१२ – नेपोलियन बोनापार्टने रशियावर चढाई केली.

### राष्ट्रीय

- १७६१ – बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवे निजामधामास गेले.
- १९८३ – तिसऱ्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताने इंग्लंडचा उपांत्य फेरीत पराभव केला.

### जन्म

- १७१३ – लॉर्ड जॉन फिलिप सॅकव्हिल, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १९१० – एव्हरेस्टच्या पहिल्या यशस्वी मोहिमेची नेतृत्व करणाऱ्या जॉन हंट यांचा जन्म.
- १९३५ – वामन कुमार, भारतीय क्रिकेटपटूचा जन्म.
- १८९६ – बाबुराव पेंढारकर, भारतीय अभिनेताचा जन्म.
- १९०८ – डॉ. विष्णू भिकाजी कोलते, महानुभाव साहित्य संशोधकाचा जन्म.

### निधन

- १२७६ – पोप इनोसंट पाचवा.
- १४२९ – गियात अल काशी, पर्शियन अंतराळतज्ञ व गणितज्ञ याचे निधन.
- १९४० – व्लादिमार पी. कोपेन, रशियन हवामानशास्त्रज्ञ याचे निधन.
- १९५५ – भारताचे सुप्रसिद्ध फिरकी गोलंदाज सदू शिंदे यांचे निधन.

## : SMS :

Bohat Saal pehle
ki baat hai.
.
.
Sorry yaar!
Kaafi Purani Baat
thi, Main Bhool Gaya.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३५.८ | २६.६ |
| अहमदनगर | ३५.९ | २४.१ |
| अकोला | ४०.६ | ३०.१ |
| अमरावती | ४१.७ | ३१.३ |
| बीड | ४३.४ | ३२.४ |
| भंडारा | ४२.३ | ३१.९ |
| बुलढाणा | ४२.७ | ३१.६ |
| चंद्रपूर | ४४.२ | ३३.१ |
| चेन्नई | ४२.२ | ३३.२ |
| नवी दिल्ली | ४२.८ | ३३.१ |
| धुळे | ३९.२ | २६.३ |
| गोंदिया | ४१.६ | ३०.९ |
| जळगाव | ४१.५ | २९.६ |
| कोल्हापूर | ३४.२ | २२.४ |
| लातूर | ३६.३ | २८.१ |
| मुंबई | ३८.९ | ३३.७ |
| नागपूर | ४१.६ | ३०.४ |
| नांदेड | ४१.१ | ३१.६ |
| नंदूरबार | ३७ | २९.१ |
| नाशिक | ३५.४ | २४ |
| पुणे | ३२.८ | २३.१ |
| पंढरपूर | ३७.६ | २७.९ |
| सातारा | ३४.९ | २२.७ |
| सांगली | ३५.६ | २३.२ |
| सोलापूर | ३८ | २८.४ |
| वर्धा | ४३ | ३२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम कायदेशीर कामे पूर्ण होतील.अभ्यासात मन रमेल. कामातील विस्तार फायदेशीर ठरेल.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, अनुकूल दिशा:उत्तर नवीन प्रस्ताव आल्यामुळे आपला उत्साह वाढणार आहे. आपली किंमत वाढणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग:हिरवा, अनुकूल दिशा:पूर्व आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:लाल, अनुकूल दिशा:पूर्व सर्वच ठिकाणी आपणास यश नवीन संधी मिळणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग:केसरी, अनुकूल दिशा:उत्तर बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टिपणाचे समाजात कौतुक होईल. सुखवस्तूंवर खर्च होईल.

**धनु :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा :पूर्व वैवाहिक जीवन आनंदी राहिल्याने कामात उत्साह राहिल. आरोग्याच्या समस्या दूर होतील.

**कर्क :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व सन्मान न मिळाल्याने निराश रहाल. कामे वेळेत पूर्ण होणार नाहीत. व्यापारात नवीन सौदे करू नका.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी,शुभ दिशा:पश्चिम संकोच करू नका, अडचणी येतील. व्यवसायात कर्मचारी त्रास देतील.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, अनुकूल दिशा:पूर्व संपत्ती संबंधात केलेली धावपळ फायदेशीर ठरेल. स्पर्धेत यश मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल.

**कन्या :** शुभ रंग:निळा, अनुकूल दिशा:पूर्व प्रस्ताव मिळतील. योजना कार्यान्वित होतील. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत.

**मीन :** शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: दक्षिण कार्यसिद्धि झाल्याने आर्थिक क्षेत्रात आशाजनक बदल घडून येतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८८



### आडवे शब्द

१. अभिवादनाचा 'साहेबी' प्रकार
४. 'वृद्धत्वी निज शैशवास जपणे' हा बाणा जपणाऱ्यांना मिळणारा ताशेरा
७. यथासांग, चारीठाव
१०. काडीमोड, ताटातूट
१२. श्रीराम सेनेतील सदस्य
१४. पद्धत
१७. करवंदाचे रान
१८. हालचालीवर ठेवलेली नजर
१९. मनातील काळेबेरे
२१. पोथीचे वाचन
२२. पातक
२३. नकोशा आठवणी
२५. सेवक
२६. स्तुती
२७. स्तुती करण्याजोगे
२९. मातृभाषा
३१. शपथ
३२. योग्य
३३. ढग (हिंदी)
३५. पांगापांग, विनाश
३९. बंदुकीची फैर, तंबाखुची गोळी
४०. भिस्त
४२. मुंबईचा घरगडी
४३. बाळभाषते पाणी
४४. रागाचा स्फोट
४६. सामूहिक व्यायाम
४७. फक्त, केवळ
४८. हावरटपणा
५०. नवरदेव
५१. काढलेली सुट्टी
५२. राक्षस
५४. अथवा, किंवा
५५. मृदा
५६. तारतम्य, प्रसंगावधान
५८. मेंढपाळ
५९. सकस, सत्वयुक्त
६१. गरज
६२. रानटी
६४. चिंता, काळजी
६५. भुकटी, पूड
६६. अख्खा उभा भारत!
६९. जन्मजात गोंडसपणा
७०. गांधारीचे पुत्र
७१. प्रतिष्ठा, आदर
७२. अग्नी, '--तो चेतवावा रे'
७३ स्तुती करणारा
७४. पूजन केले
७५. विद्या
७७. उंच पट्टीतील आवाज
७९. सौंदर्य
८०. या दोन्हीची काळवेळ माणसाच्या हाती नसते!
८१. मुक्काम, मुक्कामाचे ठाणे

### उभे शब्द

१. खरडपट्टी (ला.)
२. सुईबरोबर धावणारा
३. फायदा
४. रिकामपणाची भावना
५. मग्न, गुंग
६. चेष्टाखोर
७. अमसुलाचे–टोमॅटोचे देशी सूप
८. तीव्र राग
९. बारा वर्षांचा काळ
११. पूर्वपरवानगीने घेतलेली सुट्टी
१३. नम्रतेने मान खाली घातलेला
१५. शोध, माग
१६. दुर्लक्ष, हेळसांड
१८. किमान काळ दर्शवण्यासाठी हिच्या लावण्याचा आधार घेतला जातो
१९. सुडौल
२०. एकाग्र नजर
२२. अपमान
२४. लहरीनुसार आखलेला बेत
२५. गयावया करणे
२६. रक्षक, सांभाळणारा
२८. शक्यतेप्रमाणे, शक्य होईल तितके
२९. सामान
३०. डोंगर पोखरून काढलेला रस्ता
३१. याच्यामुळे जाडी वाढते असा समज गैर आहे
३४. दार, कवाड
३६. निव्वळ ओझी वाहणारा
३७. ही फक्त जेवायला न मिळाल्यानेच होते असे नाही!
३८. घसरगुंडीबरोबरचा खेळ
४०. लोकशाहीतील महत्त्वाचे 'देणे'
४१. श्री विष्णूचे एक नाव, रमापती
४३. राहुटी, तंबू
४५. भित्रा, कच खाणारा
४९. अधिक श्रेष्ठ, वरचढ
५३. पालिकेतील लोकप्रतिनिधी
५७. त्रागा
५८. कृतकृत्य झालेला
५९. आवरण
६०. मदीरा
६१. न तापलेले दूध
६२. रंग
६३. थोरवी
६४. निऱ्यांचा नाहीतर कामाचा!
६५. खंत, हुरहूर
६६. अजगर
६७. सन्मानाची रक्कम
६८. त्वरित, चटकन
६९. लोक
७०. शाकारणी करावे लागणारे घर
७३. आपला देश
७६. शरम
७८. राख

### जम्बो शब्दकोडे क्र. ९८७ चे उत्तर

आडवे उत्तर १.रत्नाकर ४.सलगी ६.वट ८.अपराध ११.मादक १३.रदनक १४.कड १५.कांचन १७.खाना १९.कटक २०.तर २१.परसदार २२.जवळपास २५.फराळ २७.सावरकर २९.आड ३०.वाचक ३३.नवरा ३५.समज ३६.सटरफटर ३७.जय ३९.समर ४१.नापास ४३.जलाशय ४४.बारीकसारीक ४६.कलह ४८.तहहयात ४९.कबर ५०.लवकर ५२.कसा ५४.वारेमाप ५६.कट्टा ५७.परीक्षक ५९.पोर ६०.रड्यामाणूस ६३.तरतरीत ६४.हेवा ६५.मनजीत ६७.तार ६९.लोहा ७०.वजन ७२.बेतशीर ७४.सांब ७५.कणव ७६.धनी ७७.गवत ७८.गम

उभे उत्तर : १.रमाकांत २.कमान ३.रद ५.गिरनार ६.वनराज ७.टक ८.अजा ९.राकट १०.धडकणे १२.कदर १६.चरफड १७.खादाड १८.वळवळ १९.कसकस २१.पळवाट २३.वसा २४.पार २६.देव २८.रमणीय २९.आराम ३१.चरचरीत ३२.कफ ३३.नरनारी ३४.राजस ३६.सर ३८.कोलाहल ४०.मल्लाह ४२.पाककला ४३.जल ४४.बाया–बापड्या ४५.सामाजिक समता ४६.करकरीत ४७.नरवर ४८.तलवार ५१.वय ५३.साक्षरता ५५.मारवा ५८.कतरबेत ५९.पोत ६१.मरहाण ६२.संजीवनी ६४.हेरंब ६६.तज ६८.शरम ६९.लोक ७१.नग ७३.शीग


RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री महालक्ष्मी मंदिरात यज्ञाने अधिक मास कार्यक्रमांची सांगता

पुणे (दैनिक संध्या) : श्री महालक्ष्मी मंदिर सारसबागतर्फे अधिक मास निमित्त महिनाभर विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता नुकत्याच झालेल्या यज्ञ आणि पूर्णाहुतीने झाली. सर्वदूर दुष्काळग्रस्त परिस्थिती असताना पाऊस पडू देत तसेच जगात शांतता नांदावी, याकरिता प्रार्थना देखील करण्यात आली. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल यांसह प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल व डॉ. तृप्ती अग्रवाल यांनी महिनाभर झालेल्या उपक्रमांचे संयोजन केले. यावेळी विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा, रमेश पटोदिया, मुरलीधर चौधरी यांसह पदाधिकारी व मंदिराचे कार्यकर्ते उपस्थित होते. मागील महिन्यात कमल पुष्प अर्चना आणि विष्णू यागाने कार्यक्रमांना प्रारंभ झाला होता. उपक्रमांमध्ये डॉ.भावार्थ देखणे यांचे प्रवचन, मीनू पोतदार यांचे सुंदरकांड सादरीकरण, राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प.डॉ.चारुदत्त आफळे यांचे कीर्तन यांसह श्री सूक्त हवन, सुवर्ण कमल रजत कमल अर्चना, सहस्त्र बेल पत्र अर्चना, तुळशी अर्चना, पुष्प अर्चना, दीप उत्सव असे धार्मिक कार्यक्रम झाले. याशिवाय संतोषी मुंदडा व ग्रुपचे भजन, प्रिया डिसा व ग्रुपचा गरबा, गीता परिवार तर्फे विष्णू सहस्त्रनाम सामूहिक पठण व आरती, ओम नमो भगवते वासुदेवाय नम: चे सामूहिक पठण, श्री सूक्त सामूहिक पठण, होम पूर्णाहुती असे कार्यक्रम देखील पार पडले. तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये पुस्तक तुला, गो माता अन्नकोट, झुला उत्सव, धान्य तुला दान याचे आयोजन करण्यात आले होते.




### राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार 2026 साठी स्व-नामांकन प्रक्रिया सुरू

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून दिल्या जाणाऱ्या सन २०२६ च्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी राज्यातील पात्र शिक्षकांकडून ऑनलाइन स्व-नामांकने मागवण्यात आली आहेत. इच्छुक शिक्षकांनी १० जुलैपर्यंत अर्ज सादर करावेत, असे निर्देश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहेत. शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी सुधारित मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार १५ जूनपासून राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी ऑनलाइन स्व-नामांकन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अर्जदार शिक्षकांना स्व-नामांकन सादर करता येणार आहे. शिक्षण संचालकांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि संबंधित यंत्रणांना याबाबत सूचना दिल्या आहेत. राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, तसेच मान्यताप्राप्त अनुदानित खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक आणि मुख्याध्यापक यांना अर्ज करता येईल. केंद्र सरकारकडून दिला जाणारा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार हा देशातील उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान मानला जातो. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांना या पुरस्काराद्वारे गौरवतात.

### 11 वर्षांनंतर पुणे स्मार्ट सिटीचा पडदा; ₹980 कोटी खर्चानंतरही मूलभूत प्रश्न कायम

पुणे (दैनिक संध्या) : शहराला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू केलेल्या 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड'चा प्रवास अखेर संपुष्टात आला आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या निर्देशानुसार विशेष उद्देश कंपनी (एसपीव्ही) अधिकृतपणे बंद करण्यात आली असून, तिचे अधिकारी व कर्मचारी कार्यमुक्त करण्यात आले आहेत. त्यांना महापालिकेत समाविष्ट करण्यासही मंजुरी दिली आहे. दरम्यान, गेल्या ११ वर्षांत स्मार्ट सिटी अंतर्गत विविध प्रकल्पांवर सुमारे ९८० कोटी रुपयांचा निधी खर्च झाला असला तरी वाहतूक कोंडी, खड्डे, पाणीपुरवठा आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत समस्या अद्याप कायम असल्याची टीका होत आहे. २५ जून २०१५ रोजी सुरू झालेल्या या अभियानासाठी केंद्र सरकारने ४९० कोटी, राज्य सरकारने २४५ कोटी आणि पुणे महापालिकेने २४५.०२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. या निधीतून रस्ते विकास, २४x७ पाणीपुरवठा, अत्याधुनिक वाहतूक नियंत्रण व्यवस्था, ई-बस, स्मार्ट रस्ते आणि अन्य सुविधा उभारल्या. एकूण ९८०.०२ कोटी रुपयांचा निधी विविध प्रकल्पांवर खर्च करण्यात आला. केंद्र सरकारने सर्व प्रकल्प ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याची अट घातली होती. त्यानंतर मुदतवाढ अथवा अतिरिक्त निधी न मिळाल्याने राज्य शासनाने एप्रिल २०२६ मध्ये कंपनी बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार स्मार्ट सिटीची सर्व मालमत्ता, प्रकल्प आणि देखभालीची जबाबदारी महापालिकेकडे वर्ग केली. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून ५२ लहान-मोठे प्रकल्प पूर्ण झाले. मात्र, निधीअभावी आणि तांत्रिक कारणांमुळे यांत्रिक रस्ता स्वच्छता, स्मार्ट फार्मर्स मार्केट, बांबू गार्डन आणि सार्वजनिक कला प्रकल्पांसह काही महत्त्वाच्या योजना रद्द केल्या. आता या सर्व प्रकल्पांच्या देखभालीसाठी लागणारा खर्च महापालिकेलाच करावा लागणार आहे. दुसरीकडे, कोट्यवधींचा खर्च होऊनही शहरातील मूलभूत समस्या कायम असल्याने विरोधकांनी निधीच्या वापराची चौकशीची मागणी केली.



# वेदना चिकित्सा शास्त्र हे भविष्यातील सुपर स्पेशालिटी : तज्ञ

पुणे (दै. संध्या)

भारतामध्ये वेदना चिकित्सा शास्त्र (पेन मेडिसिन) याबद्दल पुरेशी जागरूकता नाही,मात्र ज्येष्ठ नागरिकांची वाढती लोकसंख्या, खेळाडूंची वाढती संख्या आणि त्यातून अधूनमधून निर्माण होणाऱ्या दुखापती, दीर्घकालीन आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता वेदना चिकित्सा शास्त्र हे भविष्यातील एक महत्त्वाचे वैद्यकीय सुपर स्पेशालिटी क्षेत्र म्हणून झपाट्याने उदयास येत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. ही माहिति इंडियन सोसायटी फॉर स्टडी ऑफ पेन (आयएसएसपी) ची शाखा असलेल्या सोसायटी फॉर स्टडी ऑफ पेन,पुणे (एसएसपीपी) च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आयोजित वार्तालापमध्ये सोसायटी फॉर स्टडी ऑफ पेन,पुणेच्या (एसएसपीपी) अध्यक्ष डॉ.प्रज्ञा भालेराव आणि सचिव डॉ.संजोग मेकेवार यांनी दिली.

यावेळी बोलताना एसएसपीपीच्या अध्यक्ष डॉ.प्रज्ञा भालेराव म्हणाल्या की, पाठदुखी व मणक्याचे विकार, मज्जातंतूंशी संबंधित वेदना, कर्करोग, संधिवात अशा आजारांमुळे दीर्घकालीन वेदना उद्भवू शकतात. अशा अनेक स्थितींमध्ये वेदना चिकित्सा शास्त्रामध्ये प्रशिक्षित तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी आणि उपचारांची आवश्यकता असते. प्रगत निदान पध्दती, कमीत कमी छेद असणाऱ्या उपचार प्रक्रिया (मिनिमली इन्व्हेसिव्ह प्रोसिजर्स), रिजनरेटिव्ह थेरपीज आणि बहुशाखीय उपचार पद्धतींचा समाविष्ट असलेले वेदना चिकित्सा शास्त्र हे झपाट्याने विकसित होणारे वैद्यकीय क्षेत्र आहे. एसएसपीपीचे सचिव डॉ.संजोग मेकेवार म्हणाले की, उपचार न झालेल्या किंवा अपुऱ्या उपचारांच्या दीर्घकालीन वेदनांचा व्यक्तीच्या जीवनमानावर, कार्यक्षमतेवर आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे लवकर निदान आणि योग्य वेळेत उपचार हे चांगले परिणाम देऊ शकतात.त्यासाठी या




चिकित्सा शास्त्राबाबत लोकांमध्ये जागृती होणे आवश्यक आहे.

वेदना चिकित्सेबाबत असलेली दरी भरून काढण्यासाठी इंडियन सोसायटी फॉर स्टडी ऑफ पेन (आयएसएसपी) ने नुकतेच फाइंड अ पेन फिजिशियन हा राष्ट्रीय स्तरावरील लोकजागृती उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाद्वारे वेदना उपचार क्षेत्रातील तज्ञांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे आणि देशभरातील वेदनातज्ञांचे (पेन फिजिशियन) जाळे अधिक मजबूत करणे हा आयएसएसपीचा उद्देश आहे. ज्यामुळे रूग्ण लवकरात लवकर पेन फिजिशियन्स पर्यंत पोहचू शकतात.

या उपक्रमाअंतर्गत देशभरातील प्रशिक्षित पेन फिजिशियन्सची ऑनलाइन डिरेक्टरी तयार करण्यात येत असून यामध्ये आत्तापर्यंत देशभरातील सुमारे 1000 पेन फिजिशियन्स आणि पुण्यातील 30 पेन फिजिशियन्सचा समावेश आहे.

डॉ.संजोग मेकेवार म्हणाले की, ही डिरेक्टरी रूग्ण आणि वैद्यकीय तज्ञांमधील दरी भरून काढेल आणि दीर्घकालीन वेदनांवर उपचार होऊ शकतो याबाबत जागरूकता निर्माण करण्यास मदत करेल.

इंडियन सोसायटी फॉर स्टडी ऑफ पेन (आयएसएसपी) ही संस्था इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ पेन (आयएएसपी) ची भारतीय शाखा असून, देशातील वेदना चिकित्सा या क्षेत्रामध्ये प्रशिक्षण आणि संशोधनात सुधारणा करण्यासाठी कटिबध्द असलेल्या पेन फिजिशियन्सचे प्रतिनिधित्व करते. आपल्या सातत्यापूर्ण उपक्रमांचा भाग म्हणून सोसायटी फॉर स्टडी ऑफ पेन, पुणे (एसएसपीपी) तर्फे नुकतेच पेनस्कोप पुणे 2026 या आपल्या पहिल्या वार्षिक परिषदेचे पुण्यात आयोजन करण्यात आले होते. अनरेव्हलिंग फॅशिया : द हिडन की इन क्रॉनिक पेन या संकल्पनेवर आधारित या परिषदेत दीर्घकालीन वेदनांमध्ये फॅशियाची भूमिका आणि वेदना व्यवस्थापनातील नव्या उपचार पध्दतींवर चर्चा करण्यात आली.या परिषदेत भारतभरातील 150 हून अधिक पेन फिजिशियन्स सहभागी झाले होते.

रुग्ण आणि आरोग्यसेवा प्रदाते आयएसएसपीच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन जवळील पेन फिजिशियन शोधू शकतात.

## डॉ. संकेत खरपुडे यांची मालावी प्रजासत्ताकाच्या 'ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशनर' पदी नियुक्ती

पुणे (दै. संध्या)

भारत आणि मालावी प्रजासत्ताक या दोन्ही देशांमधील व्यावसायिक व आर्थिक संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. भारतामधील मालावीचे महामहीम उच्चायुक्त श्री. लिओनार्ड मेंगेझी यांनी डॉ. संकेत खरपुडे यांची पुणे (महाराष्ट्र, भारत) क्षेत्रासाठी मालावीचे ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशनर (TIC - व्यापार आणि गुंतवणूक आयुक्त) म्हणून अधिकृत नियुक्ती केली आहे.

'टीआयसी' (TIC) पदाची भूमिका आणि महत्त्व: व्यापार आणि गुंतवणूक आयुक्त हे एक अत्यंत जबाबदारीचे आणि राजनैतिक स्तरावरचे महत्त्वाचे पद आहे. या पदाचा मुख्य उद्देश दोन देशांमधील द्विपक्षीय व्यापाराला चालना देणे हा असतो. डॉ. खरपुडे यांच्यावर प्रामुख्याने खालील जबाबदाऱ्या असतील:



गुंतवणुकीला चालना: पुणे आणि महाराष्ट्रातील प्रमुख उद्योजकांना मालावी देशातील गुंतवणुकीच्या संधींची ओळख करून देणे. व्यापार विस्तार: कृषी, तंत्रज्ञान, शिक्षण आणि उत्पादन क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये आयात-निर्यात वाढवणे. बिझनेस नेटवर्किंग: भारत आणि मालावीच्या व्यावसायिक समुदायांमध्ये एक भक्कम दुवा म्हणून काम करणे.

पुणे हे भारताचे एक मोठे औद्योगिक आणि शैक्षणिक केंद्र असल्याने, डॉ. खरपुडे यांच्या या नियुक्तीमुळे स्थानिक उद्योगांना आफ्रिकन बाजारपेठेत, विशेषतः मालावीमध्ये आपला व्यवसाय विस्तारण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या महत्त्वपूर्ण नियुक्तीबद्दल डॉ. संकेत खरपुडे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पत्नीच्या निधनानंतर एकल पित्यांचा संघर्ष; मुलांसाठी आई-वडील दोन्ही भूमिका

पुणे (दै. संध्या)

पत्नीच्या निधनानंतर दोन लहान मुलांची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. मात्र, परिस्थितीपुढे हार न मानता त्यांनी स्वतःच्या वेदना बाजूला ठेवल्या आणि मुलांसाठी नव्याने जगण्याचा निर्धार केला. शाळेच्या डब्यापासून ते गृहपाठापर्यंत, आजारपणातील काळजीपासून ते भावनिक आधारापर्यंत प्रत्येक जबाबदारी त्यांनी आई-वडील अशा दोन्ही भूमिकांतून निभावली. आज त्यांची मुलगी आणि मुलगा स्वतःच्या पायावर उभे आहेत आणि आपल्या वडिलांचा आधार बनले आहेत.

आज अनेक एकल पिता मुलांची जबाबदारी उत्कृष्टरीत्या पेलत असून, पत्नीच्या निधनानंतर, घटस्फोटानंतर किंवा इतर कारणांमुळे मुलांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी खांद्यावर आलेले हे एकल पिता आज समाजासमोर कर्तव्य, त्याग आणि निःस्वार्थ प्रेमाचा नवा आदर्श उभा करीत आहेत. रविवारी (दि. 21) साजऱ्या होणाऱ्या जागतिक पितृ दिनानिमित्त म्हणजेच फादर्स डेनिमित्त काही एकल पित्यांशी संवाद साधला.

त्या संवादातून समोर आली ती त्याग, संघर्ष, प्रेम आणि जबाबदारीची एक हळवी बाजू. पहाटे उठून मुलांचा डबा बनविणे, त्यांना शाळेसाठी तयार करणे, अभ्यास घेणे, त्यांच्या भावना समजून घेणे, प्रत्येक यशात आनंद साजरा करणे आणि अपयशात खंबीरपणे पाठीशी उभे राहणे, या साऱ्या जबाबदाऱ्या ते एकहाती पार पाडत आहेत. स्वतःचे दुःख मनात दडवून मुलांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, यासाठी ते झटत आहेत. काळाच्या ओघात अनेक वडील आपल्या मुलांसाठी आई आणि वडील अशा दोन्ही भूमिका समर्थपणे पार पाडताना दिसत आहेत.

आज समाजात एकल पित्यांची संख्या वाढत असून, त्यांच्या संघर्षाकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. पत्नीच्या निधनानंतर एकट्याने संसाराचा गाडा ओढणारे सागर कळसकर म्हणाले, दीड वर्षापूर्वी पत्नीचे निधन झाले आणि आई, मुलगा व मुलीची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आली. वयोमान आणि आजारपणामुळे आईला फारशी मदत करणे जमत नाही. त्यामुळे नोकरी सांभाळत घरातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

मुलांना शाळेत सोडण्यापासून ते त्यांच्या प्रत्येक गरजेची काळजी घेण्यापर्यंत सर्व काही करावे लागते. आईची जागा कोणी घेऊ शकत नाही, हे खरे आहे. पण, मुलांसाठी आई आणि वडील दोन्ही बनण्याचा प्रयत्न करीत आहे. मुलांशी मैत्रीचे नाते निर्माण केले आहे. त्यांना समजून घेत, त्यांच्या भावनांना आधार देत पुढे जात आहे. त्यांचे हसूच माझी ताकद आहे.

## चौथीच्या 'शारीरिक शिक्षण व निरामयता' पुस्तकातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर

पुणे (दै. संध्या)

विविध खेळांची ओळख करून देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासाला चालना देऊन निरोगी जीवनशैली, स्वच्छता, सुरक्षितता, शिस्त, व्यायाम आणि सकारात्मक सवयी विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न 'बालभारती'ने इयत्ता चौथीच्या 'शारीरिक शिक्षण व निरामयता' या नव्या क्रमिक पुस्तकातून केला आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात बालभारतीच्या माध्यमातून यंदा हीरक महोत्सवी वर्षात दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या नवीन पुस्तकांची भेट विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. 'शारीरिक शिक्षण व निरामयता' या पुस्तकात १० विभाग केले आहेत. या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृती, खेळ, गाणी, संवाद, निरीक्षण आणि दैनंदिन जीवनातील सवयींच्या माध्यमातून शिकण्याची संधी मिळणार आहे.

## पुण्यात पिण्याच्या पाण्याच्या गैरवापरावर कठोर कारवाई

पुणे (दै. संध्या)

भारतीय हवामान विभागाने यंदा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी पुणे महापालिकेने कठोर पावले उचलली आहेत. महापालिका हद्दीत पिण्याच्या पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी विविध निर्बंध लागू करण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे.

या आदेशानुसार, सार्वजनिक व खासगी वॉशिंग सेंटर पाणी कपातीच्या काळात बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, तसेच सार्वजनिक आणि खासगी स्विमिंग पूल तसेच खासगी उद्यानांसाठी पिण्याचे पाणी वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. वाहन धुणे, पदपथ आणि अंगण स्वच्छ करण्यासाठीही पिण्याचे पाणी वापरण्यास मनाई करण्यात आली आहे.

खासगी गृहनिर्माण संस्थांना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प




(एसटीपी) कार्यान्वित करून त्यातील पाण्याचा वापर बागकाम व फ्लशिंगसाठी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पाण्याच्या टाक्या ओव्हर फ्लो होऊ नयेत, यासाठी ऑटोमॅटिक फ्लोट व्हॉल्व्ह बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, टाकी ओव्हरफ्लो झाल्यास १० हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे.

बांधकामे आणि रस्त्यांच्या कामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. अशा कामांसाठी केवळ एसटीपी, विहीर किंवा बोअरवेलचे पाणी वापरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित बांधकाम तातडीने बंद करून दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

# विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अर्थात 'एसआयआर'बाबत प्रशिक्षण सत्र संपन्न

## 'एसआयआर'च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता मतदारसंघ स्तरावर प्रशिक्षण सत्राचे आयोजन करा -जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम आजपासून जिल्ह्यात राबविण्यास सुरुवात झाली आहे; याअंतर्गत मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी मतदार संघनिहाय मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजन करण्यासह एसआयआरबाबत व्यापक स्वरूपात जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले. राजकीय पक्षांसोबत उत्तम समन्वय साधून त्यांचा प्रक्रियेत सहभाग वाढवावा, माध्यमांशी वेळोवेळी संवाद तसेच सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवत हा कार्यक्रम यशस्वी करावा, असेही ते म्हणाले.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या अनुषंगाने



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण सत्रात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा पिंपरी-चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त तुषार ठोंबरे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर,सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डूडी यावेळी म्हणाले, पुणे जिल्ह्यात मतदार संख्या राज्यात सर्वाधिक आहे. एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये व अपात्र मतदार यादीत समाविष्ट होऊ नये या उद्देशाने हा मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या गणना पत्रकाची छपाई आणि त्याचे वितरण नियोजनपद्धतीने करावे. एसआयआर प्रक्रियेबाबत प्रशिक्षण सत्रे आयोजित करून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओंना प्रशिक्षण देण्यात यावे. मतदारांकडून गणना पत्रकात विचारलेली माहिती वेळेत भरली जाईल, याबाबत दक्षता घ्यावी. आवश्यक तिथे बीएलओंनी मतदारांना मार्गदर्शन करावे, असेही त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, या कार्यक्रमाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या

**विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम**

या कार्यक्रमांतर्गत २९ जूनपर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) प्रशिक्षण व गणना अर्ज छपाई, ३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओंमार्फत घरोघरी भेटी देऊन अर्ज वितरण, ५ ऑगस्ट रोजी तात्पुरत्या मतदार यादीची प्रसिद्धी, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दावे आणि हरकती दाखल करणे, ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर दरम्यान दाखल हरकतींवर सुनावणी व ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

कार्यवाहीबाबत माहिती देण्यासाठी प्रत्येक बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय पक्षांसोबत बैठक घेण्यात येणार आहे, त्याच प्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनीही मतदारसंघ निहाय राजकीय पक्षांच्या तालुकाप्रमुखांसोबत बैठकीचे आयोजन करावे. त्यांना मतदान केंद्र प्रतिनिधींची (बीएलए) नेमणूक करण्यास सांगावे. अद्यापपर्यंत 'अन मॅप' झालेल्या मतदारांची यादी त्यांना उपलब्ध करून द्यावी.

शहरी भागात गृह निर्माण संस्था आणि औद्योगिक आस्थापनासोबत बैठक आयोजित करुन प्रक्रिया पूर्ण करावी. तृतीयपंथीय, दिव्यांग, देह विक्री करणाऱ्या महिला, ८५ पेक्षा अधिक वयोवृद्ध मतदाराकरिता कार्यरत सामाजिक संघटनांची मदत घ्यावी. केलेल्या कामाची विविध माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी, असेही श्री. डुडी यांनी सूचना दिल्या.

यावेळी श्रीमती कळसकर यांनी एसआयआर प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. उपस्थितांच्या शंकाचे निरसन करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## व्यवसायाभिमुख व रोजगारक्षम पिढीसाठी प्रशिक्षणाची गरज : प्रताप सिंह

पुणे (दैनिक संध्या) : “पारंपरिक शिक्षण व्यवस्थेत काळानुरूप बदल अपेक्षित आहेत. रोजगारक्षम व व्यवसायाभिमुख पिढी घडवण्यासाठी, तसेच आधुनिक विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी अभ्यासक्रमासह व्यावहारिक आणि प्रात्यक्षिकांवर आधारित कौशल्य प्रशिक्षणाची गरज आहे," असे प्रतिपादन राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी केले. पदवीसह रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करावीत आणि शालेय वयातच विद्यार्थ्याला प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, यासाठी ९० तासांची इंटर्नशिप देण्याचा विचार राज्य सरकार करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. कौशल्य विकास आणि प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण देत विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या 'लेंड अ हंड इंडिया' (लाही) संस्थेच्या २० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित गौरव सोहळ्यात सचिंद्र प्रताप बोलत होते. पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित सोहळ्यात उद्योजक प्रतापराव पवार, शिक्षणतज्ज्ञ डॉ. कमलादेवी आवटे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, 'लाही' संस्थेचे सहसंस्थापक सुनंदा माने व राज गिल्डा, अध्यक्ष मिलिंद माने आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी लाही संस्थेच्या २० वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणाऱ्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या पूर्वार्धात विद्यार्थ्यांचे चर्चासत्र झाले. प्राजक्ता चौधरी, भाग्यश्री, सावन पहारे आणि गुंजन हिवरकर या विद्यार्थ्यांनी पदवी आणि शालेय शिक्षणक्रमासोबत 'लाही' संस्थेच्या वतीने मिळालेल्या कौशल्याधारित प्रशिक्षणाची माहिती दिली. अयान पठाण आणि अनिता ढाले या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. राज गिल्डा यांनी संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त, देणगीदार, हितचिंतक यांचा परिचय करून दिला. मिलिंद माने यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला उद्योग, शिक्षण, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



## श्री ब्रह्मनाथ विद्यामंदिर पारुंडे येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

जुन्नर (दैनिक संध्या) : श्री ब्रह्मनाथ विद्यामंदिर पारुंडे येथे २१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' अत्यंत उत्साही आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. निरोगी शरीर आणि सुदृढ मनासाठी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयातील शिक्षक किशोर पगार यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले. किशोर पगार मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी देखील अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहाने सर्व योग प्रकारांचा सराव केला. या प्रसंगी विद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योगाचे मानवी जीवनातील महत्त्व अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितले. हेमंत पवार आणि सविता दातीर यांनी नियमित योगासने केल्याने शारीरिक क्षमता कशी वाढते, यावर प्रकाश टाकला. कुंदा विटे व गोल्हार यांनी मानसिक एकाग्रता वाढवण्यासाठी आणि अभ्यासातील ताणतणाव कमी करण्यासाठी योग कसा फायदेशीर ठरतो, याबद्दल विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

## महापौरांसह उद्यान-वृक्ष प्राधिकरण अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा : कांबळे



पुणे (दैनिक संध्या) : सरकारी महापौर बंगल्याच्या परिसरातील १९ झाडांची कथित बेकायदेशीर तोड झाल्याप्रकरणी महापौर मंजुषा नागपुरे, तसेच उद्यान-वृक्ष प्राधिकरणातील संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी करून फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे यांनी केली आहे. यासंदर्भात कांबळे यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीमती रुणल मुल्ला यांना निवेदन दिले. झाडतोडीसाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या होत्या का, तसेच या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी निवेदनात केली आहे. शशिकांत कांबळे म्हणाले, “सरकारी जागेवरील वृक्षतोड ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. चौकशीत महापौर मंजुषा नागपुरे किंवा उद्यान-वृक्ष प्राधिकरणातील संबंधित अधिकाऱ्यांकडून कायद्याचे उल्लंघन झाल्याचे अथवा त्यांची जबाबदारी असल्याचे आढळल्यास त्यांच्याविरुद्धही फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी.”

# मैत्रीबोध परिवाराद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

## मैत्री आणि संस्कृतीच्या मार्गानेच भारत विश्वगुरू बनेल : पूज्य मैत्रेय दादाश्रीजी

पुणे (दै. संध्या) :



मैत्रीबोध परिवाराने शांतिक्षेत्र प्रेमगिरी आश्रम, कर्जत येथे एका अनोख्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन केले. या कार्यक्रमात मैत्री, संस्कृती आणि योगामुळे प्राप्त होणाऱ्या सर्वांगीण आरोग्य लाभांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. या विशेष प्रसंगी शेकडो लोक एकत्र जमले आणि योगाच्या खऱ्या स्वरूपाचा अनुभव घेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला.

मानवतेच्या उन्नतीसाठी आणि व्यक्तीच्या अंतर्मनाचे पोषण करण्यासाठी समर्पित असलेली सामाजिक-आध्यात्मिक संस्था मैत्रीबोध परिवार योगाला आंतरिक परिवर्तन आणि सामूहिक कल्याणाचा प्रभावी मार्ग मानते. संस्थेची आध्यात्मिक मूल्ये आणि दृष्टीकोन हे योगाला जीवनपद्धती म्हणून प्रस्थापित करण्यासाठी कार्यरत असलेल्या आयुष मंत्रालयाच्या भावनेशी सखोलपणे सुसंगत आहेत.

योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून भारताच्या सभ्यतागत आणि सांस्कृतिक वारशाचा अमूल्य भाग आहे. या विचाराला अधिक बळ देण्यासाठी भारत सरकारचे माननीय संस्कृती व पर्यटन मंत्री श्री गजेंद्र सिंह शेखावत हे कार्यक्रमाला उपस्थित होते. उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी सांगितले की आधुनिक नवकल्पना आणि तांत्रिक प्रगती भारताला नव्या उंचीवर घेऊन जातील, परंतु आपल्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांमुळेच भारताला पुढील वाटचालीत आवश्यक असलेली शक्ती, स्थैर्य आणि प्रज्ञा प्राप्त होईल, ज्यामुळे भारत जगात अद्वितीय राहील.

मैत्रीबोध परिवाराचे संस्थापक, दूरदर्शी नेते आणि परिवर्तनाचे प्रणेते पूज्य मैत्रेय दादाश्रीजी यांनी मैत्री आणि संस्कृतीच्या मार्गावर प्रकाश टाकत सांगितले की ही शाश्वत मूल्ये समाजाला एकत्र आणू शकतात आणि भारताला विश्वगुरू बनविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. त्यांनी विशेषतः अधोरेखित केले की अर्थपूर्ण सामाजिक परिवर्तनाचा पाया व्यक्तीच्या आंतरिक परिवर्तनातच आहे.

या प्रसंगी श्री गोपाल कृष्ण अग्रवाल हे देखील उपस्थित होते. राष्ट्रीय विकासासाठी संस्कृती, अर्थव्यवस्था आणि धोरणांना जोडणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये ते मैत्रीबोध परिवारासोबत सक्रियपणे कार्यरत आहेत. तसेच कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री महेंद्र सदाशिव थोरवे हेही कार्यक्रमाला उपस्थित होते. संस्थेच्या विविध उपक्रमांशी सुसंगत राहून ग्रामीण कर्जतच्या विकास आणि परिवर्तनासाठी ते सातत्याने कार्य करत आहेत.

या कार्यक्रमामुळे सहभागींना योगाचा अनुभव केवळ आसने आणि शारीरिक व्यायाम यापुरता मर्यादित न राहता, शरीर, मन आणि चेतना यांच्या एकात्मतेच्या रूपात घेता आला.

कार्यक्रमाला सांस्कृतिक रंगत आणण्यासाठी गणेश वंदना तसेच भारताची प्राचीन योगिक कला असलेल्या मल्लखांबाचे मनोहारी सादरीकरण करण्यात आले. मल्लखांब ही शक्ती, लवचिकता, संतुलन आणि शिस्त विकसित करणारी भारतीय परंपरेतील एक अद्वितीय कला आहे.

अध्यात्म, संस्कृती, सामुदायिक सहभाग आणि आरोग्य यांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणणारा शांतिक्षेत्र प्रेमगिरी आश्रमातील हा आंतरराष्ट्रीय योग दिन सोहळा भारताच्या सनातन ज्ञानपरंपरेचे आणि आधुनिक युगातील तिच्या महत्त्वाचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

## सनदी लेखापालांनी सहकार क्षेत्राला व्यवस्थापनाची जोड द्यावी



पुणे (दै. संध्या) :

“यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीने सहकार चळवळीला दिशा मिळाली आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' म्हणून सहकार चळवळ महत्वपूर्ण ठरली. आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक विकास साधणारी ही सहकार चळवळ येणाऱ्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेची ताकद असणार आहे. सनदी लेखापालांनी सहकाराला अधिक सक्षम करण्यासाठी आर्थिक व्यवस्थापनाची जोड देण्यात योगदान द्यावे," असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री सीए सुरेश प्रभू यांनी केले. दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (डब्ल्यूआयआरसी), आयसीएआय पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सातारा, सांगली, इचलकरंजी व लातूर या शाखांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'सहकार पर्व- राज्यस्तरीय सहकार परिषदेचे उद्घाटन शनिवारी झाले. त्यावेळी प्रभू दूरभाष प्रणालीद्वारे (व्हर्च्युअल) बोलत होते. दोन दिवसांच्या या सहकार परिषदेत विविध विषयांवर चर्चा होत आहे. सीए अभिषेक धामणे यांनी सहकाराचे महत्व अधोरेखित करीत या परिषदेच्या आयोजनामागील भूमिका मांडली. पुढील १५ वर्षांत सहकार क्षेत्रात आमूलाग्र बदल होणार असून, येऊ घातलेल्या या नवीन पर्वात आपण सनदी लेखापाल योगदान द्यायला हवे, असेही त्यांनी नमूद केले.

## दिव्यांगांना सन्मानाने जगण्याचे साधन उपलब्ध करून द्यावे

### समाजसेवक राहुल देशमुख यांची सरकारकडे मागणी

पुणे (दै. संध्या) :

■ जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून जागतिक पितृदिनानिमित्त विशेष कार्यक्रम संपन्न




शारीरिक उणीवांवर मात करून विविध क्षेत्रांत कर्तृत्वाचे शिखर गाठणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना केवळ पुरस्कार देणे पुरेसे नाही, तर त्यांना सन्मानाने उदरनिर्वाह करता येईल अशी साधने उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते व एनएडब्ल्यूपीजीचे प्रमुख राहुल देशमुख यांनी व्यक्त केले.

साईनाथ मंडळ ट्रस्ट, एकता मित्र मंडळ , श्री शिवाजी मित्र मंडळ , वीर शिवराज मित्र मंडळ आणि अचानक मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून जागतिक पितृदिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग मुलांच्या पित्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी साहित्यिक डॉ. संगीता बर्वे, उदय जगताप, सचिन पवार, विक्रम गोगावले, हर्षद नवले, नरेंद्र व्यास, विनायक इंगवले, गोविंदा वरण दाणी , अमित जाधव, विविध मंडळाचे अध्यक्ष व आयोजक पियुष शाह, किरण सोनिवाल, सुधीर ढमाले, प्रल्हाद थोरात, ऋषिकेश भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते. अंध सनदी लेखापाल व शास्त्रीय गायक भूषण तोष्णीवाल यांचे वडील नंदकिशोर तोष्णीवाल, कर्णबधिर भरतनाट्यम नर्तिका प्रेरणा सहाणे यांचे वडील केशव सहाणे, दिव्यांग नर्तिका सायली आगवणे यांचे वडील नंदकिशोर आगवणे तसेच राष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू गौरी गाडगीळ यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित ‘यलो’ चित्रपटामुळे प्रसिद्ध असलेल्या गौरीचे वडील शेखर गाडगीळ यांचा राहुल देशमुख आणि साहित्यिक डॉ. संगीता बर्वे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. देशमुख म्हणाले, “दिव्यांग असूनही सर्वसामान्य व्यक्तींनाही कठीण वाटतील अशी अनेक कार्ये या मुलांनी करून दाखवली आहेत. त्यांच्या भविष्यासाठी शासनाने विशेष धोरण आखून त्यांना चांगल्या पदांवरील सरकारी नोकऱ्या, आर्थिक सहाय्य आणि मानधन उपलब्ध करून द्यावे. पालकांच्या पश्चातही त्यांच्या जगण्याची आबाळ होणार नाही, याची हमी शासनाने द्यायला हवी.”

डॉ. संगीता बर्वे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आजच्या काळात नैराश्य, मानसिक ताण आणि नकारात्मक विचारांमुळे तरुण पिढी अनेक समस्यांना सामोरी जात आहे. अशा परिस्थितीत अपंगत्वावर मात करून यश संपादन करणारी दिव्यांग मुले आणि त्यांना घडवणारे पालक समाजासाठी प्रेरणास्थान आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी अशा यशस्वी दिव्यांग तरुणांचे कर्तृत्व समाजासमोर आणण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

कार्यक्रमात सत्कारमूर्तींच्या पालकांनीही आपल्या संघर्षमय प्रवासाचे अनुभव कथन केले. पियुष शाह यांनी प्रास्ताविकात प्रमुख पाहुणे व सत्कारार्थींचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष जराड यांनी केले, तर सुधीर ढमाले यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रल्हाद थोरात किरण सोनीवाल पीयूष शाह व सुधीर ढमाले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरीवर आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

### विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, शिक्षक, अधिकारी व नागरिकांचा उत्साहात सहभाग

नारायणगाव (दै. संध्या) :




भारतासह जगभरात साजऱ्या करण्यात येणाऱ्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ऐतिहासिक शिवनेरी किल्ल्यावर भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मभूमीवर पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, शिक्षक, अधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पुरातत्व विभागाचे सर्वाधिकारी तसेच वन विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचा संदेश देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे संयोजन शिवछत्रपती शिवाजी महाराज कॉलेज, जुन्नर यांच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला शिवछत्रपती विद्यालय, जुन्नरचे प्राचार्य वाघमारे, प्रा. आमले, विक्रम रसाळ, सचिन काशीद (नारायणगाव) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच कमांडिंग ऑफिसर निषाद मंगरूळकर, एओ हेमचंद्र, एसएम रमाकांत सिंग तसेच ३६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, पुणे येथील पीआय स्टाफ प्रा डॉ. कॅप्टन दिलीप शिवणे नारायणगाव महाविद्यालय, कॅप्टन बाळासाहेब माने, लेफ्टनंट निलेश हांडे,ओतूर लेफ्टनंट गावडे मंचर लेफ्टनंट भगत आळे,रोहित भागवत नारायणगाव चासकर सर मंचर विशेष उपस्थिती लाभली.

यावर्षीच्या योग दिन कार्यक्रमात सुमारे ५०० एनसीसी कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यामध्ये ग्रामोन्नती मंडळ कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाचे ५३ कॅडेट्सनी सहभाग घेतला. विविध महाविद्यालये व आलेल्या कॅडेट्सनी शिस्तबद्ध पद्धतीने योगाभ्यास करून कार्यक्रमाचे आकर्षण वाढविले.


**जाहीर नोटीस**

आमचे अशिल १) श्रीमती. सुनिता सुनिल गायकवाड २) समीर सुनिल गायकवाड ३) दिक्षा सुनिल गायकवाड रा. विठ्ठलवाडी (येणेरे) ता. जुन्नर जि. पुणे येथील रहिवाशी असून त्यांची गाव मौजे विठ्ठलवाडी येथे गट नं ४ क्षेत्र ०.१० आर सामाईकात गट नं १९५ क्षेत्र १.०२ आर व २०९ क्षेत्र ०.५७ आर अशी वडिलोपार्जित मालकी हक्क ताबे वहिवाटीची मिळकत असून या मिळकती मध्ये त्यांचा समाईकातील अविभक्त हिस्सा होता व आहे. सदर मिळकतीचे तोंडी वाटप झाले असून अद्याप पर्यंत कोणतेही कायदेशीर वाटप झाले नाही. सदर मिळकतीच्या वाटप कामी मे. कोर्टामध्ये दावा दाखल करणार आहेत. असे असताना श्री ठकसेन रावजी गायकवाड हे संगनमताने त्यांचे ७/१२ सदरी असलेल्या नावाचा गैर फायदा घेऊन सदर मिळकत आमचे अशिल यांची संमती विना बेकायदेशीर विक्री करण्याच्या तय्यारीत आहेत. सबब अशा प्रकारचा बेकायदेशीर व्यवहार वर नमूद मिळकतीमध्ये कुणी करू नये. या कामी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

तरी या जाहीर नोटीसी द्वारे दवंडी देण्यात येते कि,

वर नमूद केले प्रमाणे श्री ठकसेन रावजी गायकवाड यांच्या बरोबर वर नमूद मिळकती बाबत कुणीही बेकायदेशीर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. यदाकदाचित कुणीही अशा प्रकारचा बेकायदेशीर हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल यांच्यावर बंधनकारक नसेल. या उलट तसे न वागल्यास आपणाविरुद्ध देखील आमचे अशिल यांना योग्य ती कायदेशीर कारवाई करणे भाग होईल मग होणाऱ्या खर्चास व परिणामास आपण सर्वस्वी जबादार असाल याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे नोटीस.

१९/०६२०२६

ॲड. रसूल गफुर इनामदार
ऑफिस :- साई प्लाझा आळेफाटा,
ता. जुन्नर जि. पुणे ४१२४११
मो. ९०९६०६१४४५


## जेजुरीत हरित कडेपठार उपक्रमात १००० देशी वृक्षांची लागवड

### पर्यावरण संवर्धनाचा निर्धार

जेजुरी (दै. संध्या) :



"एक पाऊल निसर्ग संवर्धनाकडे" या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाच्या वन विभाग व श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला "हरित कडेपठार उपक्रम २०२६" अरण्यषष्ठीच्या पावन मुहूर्तावर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. जेजुरी येथील कडेपठार परिसर व पायरी मार्ग परिसरात आयोजित या उपक्रमामध्ये तब्बल १,००० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच लागवड केलेल्या प्रत्येक वृक्षाच्या संवर्धनाचा संकल्प उपस्थितांनी केला.

शनिवार, दि. २० जून रोजी सकाळी आयोजित या उपक्रमात नागरिक, भाविक, सामाजिक संस्था, विद्यार्थी, युवक आणि पर्यावरणप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग घेत श्रमदान केले. वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ घेऊन पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हिवरे बाजारचे सरपंच तथा आदर्श गाव कार्यक्रमाचे कार्यकारी संचालक पोपटराव पवार उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. यावेळी श्री. डोळे सर यांनी "देवरायांचे महत्त्व" या विषयावर उपस्थित नागरिक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत जैवविविधतेच्या संरक्षणासाठी देवरायांची भूमिका अधोरेखित केली.

कार्यक्रमात सह्याद्री देवराई प्रतिष्ठानचे संस्थापक व प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे उपस्थितांशी संवाद साधला. त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सुरू असलेल्या या लोकचळवळीचे कौतुक करत, पुढील काळात लागवड केलेल्या सर्व वृक्षांची पाहणी करण्यासाठी प्रत्यक्ष भेट देण्याचे आश्वासन दिले.

याप्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी पुरंदर सागर ढोले, जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, रघुनाथ ढोले (देवराई फाउंडेशन), ऐश्वर्याताई पठारे (नगरसेविका, पुणे महानगरपालिका), रुपालीताई झेंडे (जिल्हा परिषद सदस्य, पुणे), म्हाळसाकांत नारायण जेजुरीकर (प्रमुख विश्वस्त, श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट), विश्वस्त मयुर रामचंद्र दिडभाई, विश्वस्त राजेंद्र खेडेकर तसेच मार्तंड देवस्थान ट्रस्ट, जेजुरीचे विश्वस्त यांची विशेष उपस्थिती लाभली.

या उपक्रमात महाराष्ट्र शासनाचा वन विभाग, श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी नगरपरिषद, लकडी पुल विठ्ठल मंदिर ट्रस्ट पुणे, स्वामी मल्हार प्रतिष्ठान, सृष्टी सृजन फाउंडेशन, जेजुरी सेवा संघ, निसर्गात खारीचा वाटा ग्रुप, श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट, सखी प्रेरणा मंच, उघडा मारुती मित्र मंडळ जेजुरी, व्यसनमुक्त युवक संघ महाराष्ट्र (पुरंदर तालुका), पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यालय जेजुरी, जिजामाता हायस्कूल जेजुरी, महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनी जेजुरी तसेच समस्त ग्रामस्थ, खांदेकरी व मानकरी ट्रस्ट यांचा सक्रीय सहभाग होता.


महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे- ४११००१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४५७
Web- www.mahapwd.gov.in and e-mail- eastpune.ee@mahapwd.gov.in
ई-निविदा सूचना क्रमांक २२ सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४५७) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी / २०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक २७/९/२०१८ व शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई यांचे परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ अन्वये नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | अंदाजित रक्कम रुपये (अक्षरात) |
|---|---|---|---|
| १ | शिरुर निमोणे निर्वी कुरुळी वडगाव रासाई मांडवगण फराटा रस्ता प्रजिमा ५३ किमी ५/३६५ गोलेगाव येथे लहान पुलाचे व पोचमार्गाचे बांधकाम करणे, ता. शिरुर, जि. पुणे. | १,५२,६२,१२८/- | रुपये एक कोटी बावन्न लाख बासष्ठ हजार एकशे अठ्ठावीस फक्त |

टिप

वरील निविदेत एकूण ०१ काम समाविष्ट असून या निविदेवरील संपुर्ण माहिती खालीप्रमाणे संकेतस्थळावर दि. २२-०६-२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)

https://mahatenders.gov.in (निविदा सुचना व निविदा कागदपत्रे)

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील.)

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग,
पुणे-४११००१.

*क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C1127*

## थोडक्यात पण महत्वाचे...



### दापोडीत अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई; चौघांवर गुन्हा

पिंपरी (दैनिक संध्या) : दापोडी परिसरातील एका अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम व जुगार साहित्य असा एकूण 26 हजार 740 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दापोडी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई आकाश श्रावण सोनवणे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. ही कारवाई 19 जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास जयभीमनगर, दापोडी येथील एस.आर.ए. योजनेच्या नव्या इमारतीमधील मोकळ्या जागेत करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कृष्णा रामदुलार यादव (वय 30), राकेश विजय जाधव (वय 33), दीपक लक्ष्मण साळुंखे (वय 31) आणि विशाल दिलीप ओव्हाळ (वय 27) हे विनापरवाना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी 'तीन पत्ती' हा जुगार खेळताना आढळून आले. धाडीदरम्यान आरोपींकडून रोख रक्कम आणि जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम 12 (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास दापोडी पोलीस करीत आहेत. अवैध जुगाराविरोधातील मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून परिसरातील अशा बेकायदेशीर कृत्यांवर पोलिसांची नजर कायम असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.




### पिंपळे गुरवमध्ये नवीन पाईपलाईन कामावर आक्षेप; दर्जाबाबत नागरिकांची नाराजी

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : सुदर्शननगर, जवळकरनगर आणि वैदुवस्ती या भागात अनेक दिवसांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता. यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने सुदर्शननगर येथील सुदर्शन चौक ते जगताप पेट्रोलपंपदरम्यान नवीन पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्याचे काम हाती घेतले. हे काम आता अंतिम टप्प्यात आले असून, केवळ जोडण्या (कनेक्शन) देण्याचे काम बाकी आहे. मात्र, काम पूर्णत्वास जात असतानाच त्याच्या दर्जाबाबत नागरिकांनी गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. पाईपलाईन टाकण्यासाठी रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले होते. काम पूर्ण होण्याच्या मार्गावर असतानाही संबंधित ठिकाणी योग्य प्रकारे भराव टाकून रस्ता पूर्ववत करण्यात आलेला नाही. त्यामुळे टाकण्यात आलेली खडी वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे संपूर्ण रस्त्यावर पसरत आहे. हा रस्ता मुळातच अरुंद असून, येथे दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. विखुरलेल्या खडीमुळे दुचाकीस्वारांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत असून घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. याहून गंभीर बाब म्हणजे ज्या ठिकाणी पाईपलाईन टाकण्यात आली आहे. त्या भागातील काही पाईप रस्त्याच्या पातळीपेक्षा किंचित वर आलेले असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. भविष्यात या मार्गावरून जड वाहने गेल्यास पाईपवर अतिरिक्त ताण येऊन ती निकामी होण्याची किंवा फुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. असे झाल्यास पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी खर्च करण्यात आलेले लाखो रुपये वाया जाण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### शहरात सर्पदंशाचा धोका वाढला; प्राथमिक आरोग्य केंद्रांत 'अँन्टिवेनम'चा तुटवडा

पिंपरी (दैनिक संध्या) : पावसाळा सुरू होताच शहर आणि परिसरात साप दिसण्याच्या घटनांमध्ये वाढ होते. मात्र, शहरातील महापालिकेचे प्राथमिक आरोग्य केंद्र आणि रुग्णालयांमध्ये भेट दिली असता अनेक ठिकाणी सर्पदंशावरील जीवनरक्षक 'अँन्टिवेनम' औषध उपलब्ध नसल्याचे संबंधित वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी सांगितले. मात्र, यामागे औषध देण्यासाठी प्रशिक्षित वैद्यकीय मनुष्यबळ, आपत्कालीन उपचार सुविधा, रुग्ण निरीक्षण व्यवस्थेचा अभाव दिसत आहे. त्यामुळे अशा रुग्णांना सर्पदंश उपचाराची सुविधा असलेल्या मोठ्या रुग्णालयांकडे पाठविण्यात येत आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्राथमिक आयोग्य केंद्र आणि दवाखान्यात केवळ औषधाचा साठा पुरेसा नसतो. त्यासाठी प्रशिक्षित डॉक्टर, आपत्कालीन उपचार व्यवस्था, रुग्ण निरीक्षण सुविधा, ऑक्सिजन, अतिदक्षता उपचारांची तयारी आणि संभाव्य रिॲक्शन हाताळण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा आवश्यक असते. याच कारणामुळे अनेक लहान दवाखाने किंवा प्राथमिक आयोग्य केंद्रात सर्पदंशावरील संपूर्ण उपचार व्यवस्था उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या ठिकाणी उपचार केले जात नाहीत. शहरालगतच्या नदीकाठ, डोंगरपायथा, शेती परिसर आणि वनक्षेत्रालगतच्या वस्त्यांमध्ये सर्पदंशाच्या घटना तुलनेने अधिक घडतात. अशा भागांमध्ये अँन्टिवेनम औषध उपलब्ध असलेल्या रुग्णालयांची माहिती दर्शविणारे फलक, हेल्पलाईन क्रमांक आणि जनजागृती साहित्य उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पिंपरी-चिंचवड परिसरातील सर्पदंशाच्या गंभीर घटनांमध्ये नाग, मण्यार, घोणस आणि फुरसे हे चार विषारी साप प्रामुख्याने आढळतात. सर्पदंशासारख्या आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नेमके कुठे जावे?, कोणत्या रुग्णालयात अँन्टिवेनम उपलब्ध आहे?, रुग्णाला तातडीने कुठे रेफर केले जाते? याबाबत स्पष्ट माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष मोहीम राबविण्याची गरज आहे.



# आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक जीवनशैलीस समर्पित

## संत निरंकारी मिशनचा भोसरीमध्ये योग दिन उत्साहात संपन्न

**भोसरी (दै. संध्या)**

सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन आशीर्वादाने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संत निरंकारी मिशनच्या विविध शाखांमध्ये योग आणि आध्यात्मिक जागृतीवर आधारित कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

याच अनुषंगाने पुणे झोनचे झोनल इंचार्ज श्री अशोक अहुजा जी यांनी माहिती देताना सांगितले की, संत निरंकारी मिशनची शाखा भोसरी, पिंपरी, रुपीनगर येथेही योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात श्रद्धाळू भक्तगण, सेवादल स्वयंसेवक तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आर्ट ऑफ लिविंगचे अनुभवी योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित योग सत्रात सहभागी झालेल्या सर्वांनी योगाभ्यास करून निरोगी आणि संतुलित जीवनशैली अंगीकारण्याचा संकल्प केला. सद्गुरु माता जी आपल्या विचारांमध्ये नेहमीच 'स्वस्थ मन, सहज जीवन' याचा उल्लेख करत सांगतात की, आपले शरीर हे निरंकार प्रभूची अमूल्य देणगी आहे आणि ते निरोगी ठेवणे हे आपले मूलभूत कर्तव्य आहे. त्यामुळे दीर्घायुष्य, सुदृढ आरोग्य आणि यशस्वी जीवनासाठी योग अत्यंत आवश्यक आहे.



यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना 'निरोगी जीवनासाठी योग' अशी होती. या संकल्पनेद्वारे शारीरिक, मानसिक आणि आत्मिक संतुलन यांचा समन्वय हाच खऱ्या आरोग्याचा पाया असल्याचा संदेश देण्यात आला. याच भावनेशी सुसंगत राहून संत निरंकारी मिशनने योगाला आत्म जागृती, शिस्त आणि सकारात्मक जीवनदृष्टीचे प्रभावी माध्यम मानत जनजागृतीला प्रोत्साहन दिले.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सचिव आदरणीय श्री जोगिंदर सुखीजा जी यांच्या माहितीनुसार, मिशनतर्फे देशभरातील १५०० हून अधिक केंद्रांवर सामूहिक योग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शारीरिक आरोग्य, मानसिक संतुलन आणि आध्यात्मिक चेतना यांना प्रोत्साहन देणे हा होता. निश्चितच, संत निरंकारी मिशनद्वारे आयोजित हा जनकल्याणकारी उपक्रम समाजामध्ये आरोग्य, जागरूकता आणि सकारात्मक जीवनमूल्यांविषयी प्रेरणा निर्माण करत सर्वांगीण कल्याणाचा संदेश देणारा ठरला आहे.

## संकट पाण्याचे, कर्तव्य सोबतीचे; टँकर चालकांनी दरवाढ टाळून नागरिकांना सहकार्य करावे – रामभाऊ वाकडकर

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरासह परिसरात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर टँकर चालक व मालकांनी पाण्याच्या दरात वाढ न करता नागरिकांना सहकार्य करावे, असे आवाहन भाजपा पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष रामभाऊ हनुमंत वाकडकर यांनी केले आहे.

कडक उन्हाळा, आटलेल्या बोरवेल, अपुरा पाणीपुरवठा आणि लांबलेल्या पावसामुळे हजारो कुटुंबांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. अशा परिस्थितीत पाणी ही केवळ गरज नसून जीवनावश्यक बाब बनली असल्याचे वाकडकर यांनी म्हटले आहे. टँकर व्यवसाय



चालविताना वाढलेले खर्च आणि विविध अडचणी असल्याची जाणीव असल्याचे सांगत त्यांनी, सध्याच्या गंभीर परिस्थितीत दरवाढीचा अतिरिक्त भार सामान्य नागरिकांवर टाकू नये, अशी नम्र विनंती केली आहे.

"नफ्यापेक्षा माणुसकी मोठी असते. संकटाच्या या काळात नागरिकांना सहकार्य करून सामाजिक बांधिलकी जपावी. पावसाचे दिवस जवळ आले असून तोपर्यंत सर्वांनी मिळून ही परिस्थिती सुसह्य करण्यासाठी प्रयत्न करावेत," असे आवाहन त्यांनी केले.

"पाणी विकू नका, माणुसकी जपा," असा संदेश देत टँकर चालक, मालक आणि संबंधित व्यावसायिकांनी सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून नागरिकांच्या मदतीला धावून यावे, असेही वाकडकर यांनी म्हटले आहे.

## पोलीस आयुक्तांना भेटण्याच्या वेळेत पुन्हा बदल!

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या 'पोलीस आयुक्तांची भेट' या उपक्रमाच्या दिवस आणि वेळेत प्रशासकीय कारणास्तव पुन्हा एकदा बदल करण्यात आला आहे. आता हा उपक्रम सोमवार ऐवजी दर शुक्रवारी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत पार पडणार आहे.

हद्दीतील नागरिकांना आणि तक्रारदारांना थेट पोलीस आयुक्तांना भेटून आपल्या समस्या, तक्रारी आणि सूचना मांडता याव्यात, यासाठी या विशेष उपक्रमाचे आयोजन केले जाते. यापूर्वी या उपक्रमाच्या वेळेत दोनदा बदल झाले आहेत. सुरुवातीला हा उपक्रम दर सोमवारी दुपारी ४ ते ६ या



वेळेत होत होता, त्यानंतर तो दुपारी ३ ते ५ असा करण्यात आला.

आता नागरिकांच्या सुविधेसाठी आणि प्रशासकीय कारणांमुळे यात तिसऱ्यांदा बदल करण्यात आला आहे. आता हा उपक्रम दर शुक्रवारी सकाळी अकरा ते दुपारी एक वाजताच्या दरम्यान होणार आहे. त्यामुळे सोमवारी (दि.२२ जून) रोजी जनसंवाद हा उपक्रम होणार नाही. त्याऐवजी शुक्रवारी (दि.२६ जून) रोजी सकाळी अकरा ते दुपारी एक या वेळेत आणि त्यानंतर सर्व शुक्रवारी याच वेळेत होणार असल्याचे जनसंपर्क विभागाने कळविले आहे.

## पिंपरीत PMPML बसचालकांकडून सिग्नल उल्लंघन

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोरवाडी चौक, वल्लभनगर, शगुन चौक, नाशिक फाटा या वर्दळीच्या चौकांमध्ये पीएमपीएमएल बसचालकांकडून वाहतूक सिग्नलचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. लाल सिग्नल असतानाही बस पुढे नेणे, पादचारी मार्ग ओलांडणे आणि घाईगडबडीत चौक पार करण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एक प्रकारे पीएमपीचालक वाहतुकीच्या नियमांनाच तिलांजली देताना दिसून येत आहेत; परंतु वाहतूक पोलिस याकडे दुर्लक्ष करत आहेत.



शहरातील वर्दळीचे चौक, बीआरटी मार्गावरील जंक्शन तसेच प्रमुख रस्त्यांवर पीएमपी बसकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे अनेक वाहनचालक आणि नागरिकांचे म्हणणे आहे. मोठ्या आकाराच्या बस वेगात सिग्नल तोडून गेल्यास अपघाताची शक्यता अधिक वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून चालावे लागत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते.

काही चौकांमध्ये सिग्नल हिरवा होण्याची प्रतीक्षा करणाऱ्या वाहनांच्या समोरून बस पुढे निघून जात असल्याने वाहतुकीत गोंधळ निर्माण होत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पीएमपी प्रशासनानेच वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे अपेक्षित आहे. मात्र, काही चालकांकडून वेळेच्या दबावाखाली किंवा निष्काळजीपणामुळे नियम धाब्यावर बसवले जात असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे.

वाहतुकीच्या नियमानुसार लाल सिग्नल तोडणे हा गंभीर वाहतूक गुन्हा आहे. मोठ्या बसकडून होणारे असे उल्लंघन केवळ इतर वाहनचालकांसाठीच नव्हे, तर पादचाऱ्यांसाठीही धोकादायक ठरू शकते. एखादी छोटी चूकही मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकते. पीएमपी बसचालकांकडून होणाऱ्या सिग्नल उल्लंघनाच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी चौकांमधील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करावी, नियम तोडणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करावी आणि बसचालकांना नियमित प्रशिक्षण देण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पीएमआरडीए–महारेल करार; पुण्यातील वाहतूककोंडी कमी होणार

**पिंपरी (दै. संध्या)**

पुणे महानगर प्रदेशातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी आणि रेल्वे फाटकांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (महारेल) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. या करारामुळे रेल्वे उड्डाणपूल आणि रेल्वे मार्गाखालील भुयारी मार्ग यांच्या बांधकामाला गती मिळणार असून, प्रदेशातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री तथा पीएमआरडीएचे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी पुणे महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन रेल्वे फाटकमुक्तीचा विशेष उपक्रम हाती घेतला होता. रेल्वे मार्गावरील उड्डाणपूल, पादचारी पूल (एफओबी) आणि भुयारी मार्ग यांची कामे विविध यंत्रणांमार्फत करण्याऐवजी रेल्वे प्रकल्पांचा अनुभव असलेल्या महारेलमार्फत राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले होते.




## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भाजपा युवा मोर्चा वतीने

# पिंपरी-चिंचवड शहरात १४ ठिकाणी भव्य योग शिबिरांचे आयोजन

**पिंपरी (दै. संध्या)**

भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि व्यापक जनसहभागातून साजरा करण्यात येणार आहे. पंतप्रधान Narendra Modi यांच्या प्रेरणेतून जगभरात योगाचे महत्त्व अधोरेखित झाले असून त्याच संकल्पनेला पुढे नेत भारतीय जनता युवा मोर्चाने शहरातील विविध भागांमध्ये योग दिनाचे भव्य आयोजन केले आहे.

शहरातील १४ मंडळांच्या माध्यमातून १४ विविध ठिकाणी एकाच वेळी योग दिन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हजारो नागरिक, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली, मानसिक स्वास्थ्य, शारीरिक तंदुरुस्ती आणि सकारात्मक जीवनमूल्ये समाजात रुजविण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

यमनानगर-तळवडे, आकुर्डी-शाहूनगर, भोसरी-कृष्णानगर, संत तुकाराम नगर, वाकड-थेरगाव, रहाटणी-पिंपळे सौदागर, दिघी-भोसरी, चिंचवड-काळेवाडी, चिंचवड प्राधिकरण, मोशी-चऱ्होली, तळवडेवस्ती-इंद्रायणीनगर-नेहरूनगर, पिंपरी-फुगेवाडी-बोपखेल, सांगवी-पिंपळे गुरव आणि रावेत-वाल्हेकरवाडी या भागांमध्ये योग दिनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सर्व ठिकाणी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभणार आहे.



भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी असलेल्या योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली असून आज योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून संपूर्ण जीवनशैली बनला आहे. वाढता ताणतणाव, बदलती जीवनशैली आणि आरोग्याच्या समस्या लक्षात घेता नियमित योगाभ्यासाची गरज अधिक अधोरेखित होत आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहराने शहरातील नागरिकांना योगाशी जोडण्याचा संकल्प केला आहे.

याबाबत माहिती देताना भाजयुमो पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांनी सांगितले की, "योग ही भारताची जगाला दिलेली महान देणगी आहे. प्रत्येक नागरिकाने योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवून निरोगी आणि सशक्त भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे."

योग दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहराने 'निरोगी युवा – सशक्त भारत' हा संदेश देत आरोग्यदायी समाज निर्मितीसाठी पुढाकार घेतला असून हा उपक्रम शहरातील सामाजिक आणि आरोग्यविषयक जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### ज्ञानवर्धिनी विद्यालयात योगदिन साजरा

चाकण (दैनिक संध्या) : स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालयात योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांनी स्वतः मुलांसमवेत योगा केला. मुलांना योगाचे महत्व सांगितले. याप्रसंगी शिक्षक गणेश काळे, रुपाली लांडे, अनिता देसाई, सुनिल वडेकर, आरती काबद्दे, लिना चौधरी, उर्मिला कोबल, सुनिल कोटलवार, मनिषा दातीर सर्व विभाग शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे व संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी सर्वांचे कौतुक केले.



### जावजीबुवाचीवाडी येथे पीएम किसान योजनेच्या 23 व्या हप्त्याचे थेट प्रक्षेपण

यवत (दैनिक संध्या) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पश्चिम बंगाल येथून 'पीएम किसान सन्मान निधी' योजनेच्या २३ व्या हप्त्याचे वितरण सोहळा नुकताच पार पडला. या राष्ट्रीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दौंड तालुक्यातील जावजीबुवाचीवाडी येथे आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थिती होते. जावजीबुवाचीवाडी येथे आयोजित या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी देशपातळीवर केलेल्या मार्गदर्शनाचे थेट प्रक्षेपण सर्वांनी अनुभवले. यानंतर स्थानिक स्तरावर आयोजित मार्गदर्शन शिबिरात सहायक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. पीएम किसान योजनेचे लाभ अखंडितपणे मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली माहिती अद्ययावत ठेवणे किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी भर दिला. यावेळी बोलताना सहायक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी स्पष्ट केले की, पीएम किसान योजनेच्या पुढील लाभांसाठी आता 'फार्मर आयडी' अत्यंत गरजेचा आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही तांत्रिक अडचणींशिवाय योजनेचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर आपला फार्मर आयडी तयार करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी अनेक शेतकऱ्यांनी त्यांना योजनेबाबत येणाऱ्या समस्या मांडल्या, ज्यांचे निरसन जगताप यांनी यावेळी केले. कार्यक्रमास आशिष अनपट, आबासाहेब राजवडे, रघुनाथ आखाडे, विनोद राजवडे, ऋषिकेश राजवडे, विनायक सणस, आबा सोनवणे, दाजी चौधरी यांच्यासह इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खेड तालुक्यावर भीषण पाणी संकटाचे सावट; 111 वाड्यावस्त्यांना टँकरचा आधार

राजगुरूनगर (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील जलस्रोतांनी तळ गाठल्याने पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. तालुक्यातील ११ गावांसह एकूण १७ गावांतील १११ वाड्यावस्त्यांवर भीषण पाणीटंचाईचे सावट असून, सुमारे २७ हजार नागरिकांचा पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवरच आधार राहिला आहे. प्रशासनाने एप्रिल महिन्यापासून पाच अधिग्रहित विहिरींमधून १४ टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा सुरू केला आहे. मात्र, टँकरना १० ते ३० किलोमीटर अंतरावरील गावांमध्ये पाणी पोहोचवावे लागत असल्याने पुरवठ्यात विलंब होत असून, नागरिकांना पाण्यासाठी तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे. पाणीटंचाईचा फटका पशुपालकांनाही बसत आहे. जनावरांना पाणी पाजण्यासाठी विहिरीपर्यंत नेणे आणि पाणी उपसण्याचे काम दिवसभर करावे लागत असल्याने पशुपालक हवालदिल झाले आहेत. शाळा सुरू झाल्यानंतर पिण्याच्या पाण्याच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांसह शालेय पोषण आहारासाठीही पाण्याचे जार विकत घेण्याची वेळ अनेक शाळांवर आली आहे. दरम्यान, भामा-भीमा नदीपात्र कोरडे पडल्याने अनेक सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजना बंद पडण्याच्या उंबरठ्यावर आहेत. पाझर तलाव कोरडे पडले असून, विहिरींनीही तळ गाठला आहे.

### चाकणला स्व.आ. सुरेशभाऊ गोरे विद्यालयात गुणगौरव

चाकण (दैनिक संध्या) : स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील व भामा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या दहावी आणि बारावी मधील यशस्वी विद्यार्थी यांचा सन्मान करण्यात आला. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषाताई गोरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. स्व.आ. सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय दहावी निकाल ९८ टक्के, भामा स्कुल ९७ टक्के लागला. बारावी निकाल ८७ टक्के लागला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक अंकुश पवार, निलेश संभूस, ओंकार गोरे, विष्णू गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, पर्यवेक्षक सविता कुमकर, ज्योती अनाप, विभाग प्रमुख सुवर्णा चौधरी, दत्तात्रय लिंभोरे, विद्यार्थी, पालक आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमिला गोरे यांनी आभार मानले.




# गुटखा बंदी असतानाही गुटखा येतो तरी कुठून?

## २० रुपयांची विमल ५० रुपयांना; काही ठिकाणी छुप्या तर काही ठिकाणी खुलेआम विक्री सुरूच

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

राज्यात गुटखा विक्रीवर बंदी असतानाही पूर्व हवेली परिसरात गुटख्याचा काळाबाजार पुन्हा एकदा तेजीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून राज्यभर विविध ठिकाणी कारवाया सुरू असताना उरुळी कांचन, सोरतापवाडी, कुंजीरवाडी, परिसरातील अनेक भागांमध्ये गुटखा छुप्या पद्धतीने तर काही ठिकाणी खुलेआम विक्री होत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे "गुटखा बंदी असूनही हा माल नेमका येतो तरी कुठून?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पूर्वी २० रुपयांना मिळणारी विमल गुटख्याची पुडी सध्या तब्बल ५० रुपयांना विकली जात असल्याचे समोर येत आहे. बंदी आणि कारवाईच्या भीतीमुळे पुरवठा कमी झाल्याचा फायदा घेत काही विक्रेते वाढीव दर आकारत असल्याची चर्चा आहे. ओळखीच्या ग्राहकांना गुप्तपणे गुटखा उपलब्ध करून दिला जात असून, त्यासाठी जादा पैसे मोजावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, किरकोळ विक्रेत्यांकडे मोठ्या प्रमाणात गुटखा पोहोचत असल्याने या मागे एखादी संघटित साखळी कार्यरत आहे का, अशी शंका व्यक्त केली जात आहे. किरकोळ दुकानदारांकडे माल येतो तरी कुठून, याचा शोध घेण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. काही ठिकाणी ग्राहकांना थेट गुटखा देण्याऐवजी सांकेतिक पद्धतीने व्यवहार केले जात असल्याचेही बोलले जात आहे.




गुटखा विक्रीवर बंदी असतानाही हा अवैध व्यवसाय दिवसेंदिवस फोफावत असल्याने संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गुटखा खाणारे नागरिक खुलेआम गुटखा खात असल्याचे निदर्शनास येत आहे.

प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाईचे दावे केले जात असले तरी प्रत्यक्षात वाढीव किमतीत गुटख्याची विक्री सुरूच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कारवाई केवळ साठेबाजांपुरती मर्यादित राहत आहे का, अशी चर्चा परिसरात रंगू लागली आहे.

संबंधित प्रशासनाने मोहीम राबवून गुटखा पुरवठ्याची साखळी उघड करणे गरजेचे आहे. केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करून प्रश्न सुटणार नसून, मूळ पुरवठादार आणि साठेबाजांवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

राज्यात गुटखा बंदी आहे, मग २० रुपयांची पुडी ५० रुपयांना विकली जात असताना हा माल किरकोळ विक्रेत्यांपर्यंत पोहोचतो तरी कुठून? गुटखा बंदी केवळ कागदावरच आहे का?" असा सवाल आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, संबंधित यंत्रणांनी तातडीने ठोस कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## तणाव दूर करण्याचा एकमेव मार्ग फक्त योग - प्रमिला गोरे

**चाकण (दै. संध्या)**

शरीर आणि मन या दोघांमध्ये निर्माण होणारा तणाव दूर करण्याचा एकमेव आणि उत्तम मार्ग म्हणजे फक्त योग असल्याचे प्रतिपादन ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या प्राचार्या प्रमिला गोरे यांनी केले.

जागतिक योग दिनानिमित्त चाकण येथे स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालयात योग दिन मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. प्रारंभी खेड तालुक्याचे माजी आमदार स्व.सुरेशभाऊ गोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी गणेश काळे, रुपाली लांडे, अनिता देसाई, सुनिल वडेकर, आरती काबद्दे, लिना




चौधरी, उर्मिला कोबल, सुनिल कोटलवार, मनिषा दातीर आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी व सेवक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्या प्रमिला गोरे पुढे म्हणाल्या," आंतरराष्ट्रीय योग दिवस हा दरवर्षी २१ जून रोजी संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. समाजाच्या दृष्टीने ही कौतुकास्पद बाब आहे. योगाचा उगम भारतात झाला. योग हा शब्द संस्कृत मधून आला आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्राच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला एकमुखी पाठिंबा दिला होता. डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता मिळाल्यानंतर दि.२१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी सांगितले की,"आंतरराष्ट्रीय योग दिवस हा दरवर्षी जून महिन्यातील २१ तारखेला जगभरात साजरा केला जातो. या योग दिनात सर्वांचा सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. ताण तणाव दूर करण्यासाठी प्रत्येकाने योगाला प्राधान्य दिले पाहिजे." उर्मिला कोबल यांनी सर्वांचे आभार मानले.

## राजगडवर पर्यटक दरीत कोसळला; झाडाला अडकल्याने जीव वाचला

**राजगड (दै. संध्या)**

राजगड किल्ला पाहण्यासाठी आलेल्या एका युवक पर्यटकाचा पाय घसरून तो दरीत कोसळल्याची घटना शनिवारी घडली. सुदैवाने तो एका झाडाला अडकल्याने मोठी दुर्घटना टळली. या अपघातात युवक गंभीर जखमी झाला असून आपत्ती व्यवस्थापन विभागाने दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर त्याची सुखरूप सुटका केली.

मिळालेल्या माहितीनुसार, अविनाश श्रावण बागुल (वय २५, मूळ रा. जळगाव) हा युवक आपल्या कुटुंबीयांसमवेत राजगड किल्ला पाहण्यासाठी आला होता. बालेकिल्ल्याकडे जात असताना मुख्य मार्ग सोडून तो दुसऱ्या वाटेने गेला. यावेळी त्याचा पाय घसरल्याने तो सुमारे ४० ते ५० फूट खोल दरीत घसरत गेला. मात्र, तो एका झाडाला अडकल्याने त्याचा जीव वाचला. या अपघातात त्याच्या पाठीच्या मणक्याला, मानेस व पायाला गंभीर दुखापत झाली.

घटनेनंतर सोबत असलेल्या पर्यटकांनी तत्काळ वेल्हे पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी ही माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाला कळवताच बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या जवानांनी दोन तास बचावकार्य राबवून युवकाला बाहेर काढले. त्यानंतर त्याला पोलिस प्रशासन व नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

## श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**काळदरी (दै. संध्या)**

काळदरी येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी येथे रविवार दि. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

"भारताची प्राचीन आणि अमूल्य परंपरा असलेला योग आज केवळ व्यायामाची पद्धत नसून निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाचा आधार बनला आहे. योगामुळे शरीर तंदुरुस्त राहण्यासाठी, मानसिक तणाव कमी करण्यासाठी, एकाग्रता वाढविण्यासाठी आणि मनःशांती मिळविण्यासाठी मदत होते. त्यामुळेच आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत योगाचं महत्त्व अधिक वाढलं आहे. आणि म्हणूनच दरवर्षी संपूर्ण जगभरात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. योग म्हणजे स्वतःशी जोडणारा सर्वात सुंदर संवाद होय." अशा प्रकारे प्रशालेचे प्राचार्य मा श्री पांडुरंग दुर्गाडे यांनी कार्यक्रमाच्या प्रारंभी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

त्यानंतर विद्यालयाचे क्रीडा शिक्षक मा श्री शिवाजी गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वृंद यांनी सामूहिकरित्या विविध सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम व ध्यानधारणा केली. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक



व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते तसेच निरोगी जीवनशैली विकसित होते, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

यावेळी सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन तसेच कपालभाती, अनुलोम - विलोम यांसारखे विविध प्राणायाम प्रकारांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून योगाचे महत्त्व जाणून घेतले.

या प्रकल्पाचे खरे शिल्पकार असलेले सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड या संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, संस्थेचे सचिव तथा माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक-सचिव - विश्वस्त- प्रा. सीए. डॉ. एम एस जाधव (सर), संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, सहसचिव दत्तात्रय गवळी,व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे कौतुक केले

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा संतोष नवले, सुनील घोडके, संजय भिंताडे, पंडित चेंडके, बाळू पोमणे, सौ कविता शेलार, पांडुरंग जाधव, अशोक भगत, संतोष दोडके या सर्वांनी विशेष परिश्रम घेतले.

शेवटी विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करून निरोगी व सशक्त जीवन जगण्याचा संदेश देण्यात आला.

# नीरा खोऱ्यातील चार धरणांत केवळ ५.२३ टीएमसी साठा; शेतकऱ्यांची चिंता वाढली

**नीरा (दै. संध्या)**

जून महिन्याचा तिसरा आठवडा संपत आला तरी नीरा खोऱ्यातील प्रमुख धरणांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झाला नसल्याने शेतकरी वर्गाची चिंता वाढू लागली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा नीरा-देवघर, वीर, भाटघर आणि गुंजवणी या चारही धरणांतील पाणीसाठा कमी असल्याचे चित्र समोर आले आहे. सध्या या चार धरणांमध्ये मिळून केवळ ५.२३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असून, तो एकूण क्षमतेच्या सुमारे १०.८४ टक्क्यांपर्यंतच मर्यादित आहे. मागील वर्षी आजच्या दिवशी तो २१.४९ टक्के होता.

खरीप हंगामाच्या तोंडावर धरणांतील ही स्थिती शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालणारी ठरत आहे. पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी लावलेली नसल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे लागून राहिले आहे. अनेक भागांमध्ये पेरणीची तयारी पूर्ण झाली असली



तरी पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी संभ्रमावस्थेत आहेत.

वीर धरणात १.७१७ टीएमसी म्हणजे १८.२५ टक्के, निरा-देवघरमध्ये १.०१६ टीएमसी म्हणजे ८.६५ टक्के, भाटघरमध्ये १.८४४ टीएमसी म्हणजे ७.८५ टक्के तर गुंजवणी धरणात अवघा ०.६६२ टीएमसी म्हणजे १७.९३ टक्के असे एकूण चारही धरणात एकुण ५.२३८ टिएमसी म्हणजे १०.८४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मागील वर्षी याच कालावधीत या धरणांमध्ये १०.३८८ टिएमसी म्हणजे २१.४९ टक्के अधिक पाणीसाठा होता. त्यामुळे यंदाच्या तुलनेत परिस्थिती काहीशी चिंताजनक मानली जात आहे.

नीरा उजवा कालवा आणि डावा कालवा परिसरातील शेतकरी सध्या आवर्तनांवर अवलंबून आहेत. कालव्यांमधून सुरू असलेले आवर्तन मागील दोन दिवसांत बंद झाला असल्याने पुढील काळात पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे. पिण्याच्या पाण्यासह सिंचनाची गरज भागवताना जलसंपदा विभागासमोरही मोठे आव्हान उभे राहणार आहे.

"पाऊस वेळेत आणि मुबलक झाला तरच धरणांतील साठ्यात वाढ होईल, अन्यथा खरीप हंगाम धोक्यात येऊ शकतो," अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण आणि तुरळक सरी पडत असल्या तरी दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

नीरा खोऱ्यातील लाखो शेतकऱ्यांच्या आशा आता मान्सूनच्या पुढील वाटचालीवर अवलंबून असून, धरणांतील घटता साठा आणि पावसाचा विलंब यामुळे ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसाने लवकरच जोरदार हजेरी लावावी, अशीच प्रार्थना शेतकरी आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

वीर धरणाच्या पाणीपातळीत २०१९ नंतर पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. धरणाच्या दोन्ही कालव्यातून होणारा पाण्याचा विसर्ग बंद करण्यात आला आहे. आपत्कालीन व्यवस्थापन म्हणून उर्वरित पाणीसाठा शिल्लक असल्याचे उपविभागीय अधिकारी राहुल मिसाळ यांनी सांगितले.

## महाळुंगे पडवळ रस्ता कामात अनियमितता; निकृष्ट दर्जामुळे ग्रामस्थांचा संताप

**महाळुंगे पडवळ (दै. संध्या)**

आंबेगाव तालुक्याच्या उत्तर भागातील चिंचोली-चास-महाळुंगे या गावांना जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत गंभीर अनियमितता समोर येत असून, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. सुमारे दीड कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेला हा रस्ता अनेक ठिकाणी दर्जाहीन झाल्याची तक्रार होत आहे.


चिंचोली परिसरात सुमारे २०० मीटर काँक्रिटीकरण निकृष्ट झाल्यामुळे ते पुन्हा उखडून टाकावे लागल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यासह गिधड ओढ्यावर बांधण्यात आलेल्या पुलाच्या कामात काँक्रीटमध्ये दगड-गोट्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रस्त्यावर करण्यात आलेल्या डांबरीकरणाची जाडी कमी असल्याचेही स्पष्ट दिसत असून, अनेक ठिकाणी अपेक्षित खडीच्या दोन थरांऐवजी एकच थर टाकण्यात आला आहे.

याशिवाय रस्त्याच्या दुतर्फा साइडपट्ट्या भरल्या नसल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली असून, अपघाताचा धोका वाढला आहे. या मार्गाचे काम मागील वर्षांपासून रखडलेले असून, कामाच्या विलंबामुळे ओढ्यावरील पुलावर यापूर्वी एक गंभीर अपघात घडला होता.या दुर्घटनेत एका टेम्पोचालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून देण्यात आलेले तपासणी दाखले 'मॅनेज' करून मिळविले असल्याची शंका व्यक्त होत आहे.

> या रस्त्याच्या कामाचे संपूर्ण ऑडिट करण्यात यावे. वापरण्यात आलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे आहे. पुलाच्या कामात गंभीर त्रुटी आहेत. हे काम सार्वजनिक बांधकाम विभाग घोडेगाव यांच्यामार्फत सुरू असून, कामाबाबतचा माहितीफलकही कुठेच लावलेला नाही, ही बाबही संशयास्पद आहे.
>
> \- बाबाजी चासकर, अध्यक्ष, हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठान




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# आजारांना दूर ठेवण्यासाठी योग हा रामबाण उपाय - मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

जीवनशैलीमध्ये झालेल्या बदलांमुळे सध्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. या आजारांना दूर ठेवण्यासाठी योग हा रामबाण उपाय आहे. त्यामुळे नियमित योग करून जीवनशैलीविषयक आजारांना दूर ठेवले पाहिजे, अशा शब्दांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित केले.

जुहू बीचवरील फूड कोर्ट जवळ आयोजित 12 व्या जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, शिवप्रकाश, केशव उपाध्ये, पवन त्रिपाठी, दीप्ती वायकर, उषा बेन आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सातत्याने योग करणारा व्यक्ती हा कुठल्याही मानसिक परिस्थितीमध्ये असली तरी आलेल्या आव्हानांचा यशस्वीपणे सामना करू शकतो. त्यामुळे योग विद्येचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. नियमितपणे योग करून आपण आपले शरीर निरोगी व मन प्रसन्न ठेवूया, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

जगभरात 21 जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्र संघामध्ये भारताने मांडला. संयुक्त राष्ट्र संघाच्या इतिहासात सर्वात कमी कालावधीत आणि कुठलाही विरोध न होता मंजूर झालेला हा प्रस्ताव आहे. भारताने दिलेल्या प्रस्तावानुसार आज जगभरात योग होत आहेत. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व जगाला पटले आहे. विश्वामध्ये योग विद्या आणि योग चिकित्सेबद्दल मोठे कुतूहल निर्माण झाले असल्याचेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

व्यक्ती ही केवळ शरीर नसून मन आणि आत्मा सुद्धा असल्याचे अधोरेखित करीत मुख्यमंत्री म्हणाले, माणसाचे मन निसर्गाशी जुळलेले आहे. त्यामुळेच योग विद्येमध्ये केवळ शरीराचा विचार न करता मन, आत्मा आणि शरीर या तिन्हींचा विचार करण्यात आलेला आहे. योग विद्येमध्ये मनाचा निसर्गातील तत्वांशी असलेला संबंध हा पुनर्जीवित करण्यात येतो. सातत्यपूर्ण योग केल्याचा परिणाम शरीरावर तर होतोच पण मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यावरही होतो.

कार्यक्रम प्रसंगी शिवप्रकाश यांनीही आपले विचार मांडले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध योगासने केली. कार्यक्रमाला योगशिक्षक, योग करणारे नागरिक उपस्थित होते.




## थोडक्यात पण महत्वाचे



### 'गेटवे ऑफ इंडिया' येथे योगाभ्यास कार्यक्रम

मुंबई (दैनिक संध्या) : योग भारताने जगाला दिलेले आरोग्याचे अनमोल वरदान आहे. योग ही केवळ व्यायामपद्धती नसून संपूर्ण जीवनशैली आहे. प्रत्येक नागरिकाने दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे आवाहन केंद्रीय बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुंबई बंदर प्राधिकरणाच्या वतीने गेटवे ऑफ इंडिया येथे आयोजित योग कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री कमलेश पासवान, खासदार डॉ. निशिकांत दुबे, खासदार रवी किशन, मुंबई प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. एम. अंगमुथू, उपाध्यक्ष आदेश तितरमारे, अभिनेत्री ईशा देओल आणि नीतू चंद्रा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल म्हणाले, योगामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्थैर्य, भावनिक संतुलन आणि तणावमुक्त जीवन साध्य होते. 'वन अर्थ, वन हेल्थ' या संकल्पनेला योग अधिक बळकट करतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारामुळे योगाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाली असून आज जगभरातील कोट्यवधी लोक निरोगी जीवनासाठी योगाचा स्वीकार करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### योग निरोगी व संतुलित जीवनाचा मंत्र- आठवले

मुंबई (दैनिक संध्या) : योग भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून निरोगी, संतुलित आणि सकारात्मक जीवन जगण्याचा मंत्र आहे. प्रत्येकाने नियमित योगाभ्यास करावा, असे आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मलबार हिल येथील प्रियदर्शनी पार्क येथे आयोजित योग कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, योगामुळे शरीर आणि मन सुदृढ राहते, तसेच जीवनात सकारात्मकतेची ऊर्जा निर्माण होते. बदलत्या जीवनशैलीत आरोग्य जपण्यासाठी योग हा सर्वात प्रभावी माध्यम असून प्रत्येकाने आपल्या जीवनात समावेश करावा. प्रियदर्शनी पार्कच्या अध्यक्षा आणि सामाजिक कार्यकर्त्या सुसीबेन शाह यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला खासदार मिलिंद देवरा, आमदार मनीषा कायंदे, सिद्धिविनायक मंदिर न्यासाच्या विश्वस्त मीना कांबळी, माजी न्यायमूर्ती सी. व्ही. भडंग उपस्थित होते. योगगुरू रवी दीक्षित आणि अन्वय दीक्षित यांच्या योगिक गुरुकुल, डॉ. रोहित साने यांच्या माधवबाग तसेच रेखा गुप्ता यांच्या इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डन यांनी आयोजनात सहभाग घेतला.



### शासकीय पडीक जमिनी महिला बचत गटांना

मुंबई (दैनिक संध्या) : शासकीय पडीक जमिनी महिला बचत गटांना दिल्या जाणार आहेत. चारा आणि बांबू लागवडीसाठी केवळ एक रुपयात जमीन उपलब्ध केली जाईल.'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत राज्यातील शासकीय पडीक जमिनी नोंदणीकृत महिला बचत गट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे बचत गट आणि 'उमेद/माविम' अंतर्गत येणाऱ्या ग्रामसंघांना एक रुपया दराने भाडेपट्ट्याने दिल्या जाणार आहेत. राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदारांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावनिहाय शासकीय जमिनींचा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. शासकीय जमिनींवर झालेली खासगी अतिक्रमणे काढून टाकावीत व उपलब्ध जमिनींची माहिती जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

# योग ही भारतीय संस्कृतिची अमूल्य परंपरा- केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल

■ मुंबई (दै. संध्या)

योग ही भारतीय संस्कृतिची अमूल्य परंपरा असून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारे प्रभावी माध्यम आहे. योगामुळे निरोगी, सकारात्मक आणि शिस्तबद्ध जीवन जगण्याची प्रेरणा मिळत असून प्रत्येकाने योगाचा समावेश आपल्या दैनंदिन जीवनात करावा, असे आवाहन केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनी केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मालाड पश्चिम येथील दाना-पानी बीचवर केंद्रीय मंत्री श्री. गोयल यांच्या उपस्थितीत सामूहिक योगाभ्यास कार्यक्रम पार पडला. या योगाभ्यास कार्यक्रमास विविध वयोगटांतील नागरिकांनी सहभाग घेतला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारामुळे आज संपूर्ण जग भारताच्या या प्राचीन परंपरेचा स्वीकार करत आहे. योगाचा नियमित सराव करून निरोगी व सशक्त भारताच्या निर्मितीत प्रत्येक नागरिकाने योगदान द्यावे, असे आवाहनही केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी केले आहे.



# राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील ३८ रिक्त जागांसाठी मतदान प्रक्रिया संपन्न

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील १४ जिल्ह्यांतील ८ नगरपरिषदा व १४ नगरपंचायतींमधील एकूण ४७ रिक्त पदांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. नामनिर्देशनपत्रे माघारी घेतल्यानंतर १० जिल्ह्यांतील ७ नगरपरिषदा आणि ७ नगरपंचायतींसाठी एकूण ३८ रिक्त जागांसाठी आज २० जून २०२६ रोजी मतदान घेण्यात आले असून या निवडणुकीत सरासरी ७१.८४ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

आज सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ८१.४९ टक्के, नाशिक जिल्ह्यातील मनमाड नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ६६.५२ टक्के, बीड जिल्ह्यातील गेवराई नगरपंचायत / नगरपरिषदेकरिता ७६.३३ टक्के आणि अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपंचायत / नगरपरिषदेकरिता ७३.३३ टक्के तर अकोट नगरपंचायत / नगरपरिषदेकरिता ६७.३१ टक्के मतदान झाले. या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये सरासरी ७२.१२ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

तसेच, आज झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये रायगड जिल्ह्यातील पाली नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ८५.३० टक्के, नाशिक जिल्ह्यातील पेठ नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ८४ टक्के, लातूर जिल्ह्यातील अहमदपूर नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ६४.५४ टक्के, वाशिम जिल्ह्यातील मानोरा नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ७७.५७ टक्के आणि नागपूर जिल्ह्यातील हिंगणा नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ७६.३१ टक्के मतदान झाले. गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ७५.०१ टक्के, कुरखेडा नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ८०.३७ टक्के आणि अहेरी नगरपरिषद / नगरपंचायतीकरिता ६१.५० टक्के मतदान झाले.

# योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवा : गिरीश महाजन

■ नाशिक (दै. संध्या)

भारताच्या ऋषी-मुनींनी जगाला दिलेली योग ही अमूल्य देणगी आज संपूर्ण जगाने स्वीकारली आहे. योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून शरीर, मन आणि आत्मा यांना जोडणारी जीवनशैली असून तणावमुक्त, निरोगी, सशक्त आणि सकारात्मक जीवनाची गुरूकिल्ली आहे. असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा व कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज नाशिक महानगरपालिका व सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने भोईर मळा, महादेव कॉलनी समोर, मखमलाबाद रोड येथील वन उद्यानात आयोजित योग दिन कार्यक्रमात मंत्री महाजन बोलत होते. यावेळी महापौर हिमगौरी आडके, महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त अमित रंजन, अतिरिक्त आयुक्त प्रदिप चौधरी, योगशिक्षिका प्रज्ञा पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधी, मान्यवर, विद्यार्थी व नागारिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुंभमेळा मंत्री श्री. महाजन म्हणाले की, योगाचे महत्त्व आज भारताच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचले आहे. जगातील जवळपास प्रत्येक देशात योगाचा प्रसार झाला असून भारताने जगाला आरोग्य, शांती आणि संतुलनाचा संदेश दिला आहे. याचे मोठे श्रेय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाला जाते. त्यांच्या प्रयत्नांमुळे संयुक्त राष्ट्र संघाने २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून घोषित केला आणि भारताच्या प्राचीन योग परंपरेला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली.

ते पुढे म्हणाले की, आधुनिक जीवनशैलीमुळे तणाव, नैराश्य, उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार यांसारख्या विविध आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत योग हा सर्वात प्रभावी, सुलभ आणि नैसर्गिक उपाय ठरतो. नियमित योगाभ्यासामुळे शरीर सुदृढ राहते, मन प्रसन्न राहते, विचार सकारात्मक होतात आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक बनतो. योग केवळ शारीरिक स्वास्थ्य देत नाही, तर मानसिक स्थैर्य, आत्मविश्वास आणि आत्मशक्तीही वाढवितो.

त्यामुळे योग हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला पाहिजे. विशेषतः युवा पिढीने योगाला जीवनशैली म्हणून स्वीकारणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर हिमगौरी आडके म्हणाल्या की, भारत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी निरोगी, सक्षम आणि सकारात्मक समाजाची आवश्यकता आहे. योग हीच त्या निरोगी समाजाची भक्कम पायाभरणी आहे. प्रत्येक नागरिक निरोगी असेल तर देश अधिक सक्षम बनेल आणि विकासाचा वेग अधिक वाढेल. योग हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता वर्षातील प्रत्येक दिवस योगाचा दिवस बनविण्याची गरज आहे. कुटुंब, मित्रपरिवार आणि समाजात योगाबाबत जनजागृती करून प्रत्येक घरात, गावात आणि शहरात योगाचा संदेश पोहोचविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.




# एकल महिला धोरणासाठी शहरातील नागरिकांनी सूचना पाठवाव्यात

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर सर्व प्रकारच्या एकल महिलांच्या सर्वांगीण विकास व सक्षमीकरणासाठी शासन स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करीत आहे. या धोरणाची प्रभावी व सर्वसमावेशक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी नागरिक, महिला संघटना, सामाजिक संस्था, अभ्यासक व विषयतज्ज्ञ यांनी आपल्या सूचना व अभिप्राय व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक ९८६९८६९२८३ वर पाठवावेत, असे आवाहन मुंबई शहर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक व कायदेशीर सक्षमीकरणासाठी धोरण तयार करताना विविध स्तरांवरील अनुभव व सूचना विचारात घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे सूचना पाठविताना केवळ समस्या मांडण्याऐवजी त्यावरील ठोस उपाययोजना, नवीन योजना, विद्यमान योजनांमधील आवश्यक सुधारणा तसेच कायदेशीर बदल याबाबत सविस्तर सूचना सादर कराव्यात.

प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा एकल महिला धोरणाचा अंतिम मसुदा तयार करताना गांभीर्याने विचार करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व संबंधितांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे शोभा शेलार यांनी म्हटले आहे.

# विश्वाशी जोडणारी जीवनपद्धती म्हणजे योग - निवासी आयुक्त श्वेता सिंघल

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

योग हा केवळ शरीर तंदुरुस्त ठेवण्याचा व्यायाम नसून मन, शरीर आणि आत्म्याला ब्रह्मांडाच्या नैसर्गिक लयीशी जोडणारी जीवनपद्धती आहे. योग म्हणजे आपल्या अस्तित्वाला विश्वाशी जोडणारे प्रभावी माध्यम असून तो निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाचा आधार आहे, असे प्रतिपादन निवासी आयुक्त तथा सचिव श्वेता सिंघल यांनी केले.

नवीन महाराष्ट्र सदन येथे महाराष्ट्र सदन, दिल्ली मराठी प्रतिष्ठान आणि आयुष मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमास दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे संस्थापक वैभव डांगे, सहाय्यक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, महाराष्ट्र सदनचे व्यवस्थापक प्रमोद कोलापत्ते, उपनिवास अभियंता जमुनाप्रसाद गंगवार तसेच दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी अभिजित गोडबोले, विवेक गर्गे, अभिजित पाठक आणि नितीन सरदारे यांच्यासह महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची 'निरोगी वार्धक्यासाठी योग ही जागतिक संकल्पना' केंद्रस्थानी ठेवून विशेष योगाभ्यास सत्राचे आयोजन करण्यात आले होते. वाढत्या वयातही शारीरिक सुदृढता, मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक जीवनशैली जपण्यासाठी योग हा अत्यंत प्रभावी मार्ग असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेचे योग प्रशिक्षक आदित्य देव यांनी योगाचे वैज्ञानिक महत्त्व, आरोग्यदायी फायदे आणि दैनंदिन जीवनातील उपयुक्तता सांगत दैनंदिन व्यस्त जीवनातून काही मिनिटे योगासाठी दिल्यास शरीर आणि मन दोन्ही सुदृढ व प्रसन्न राहत असल्याचे प्रतिपादीत केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शक अमर यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली.

या योगसत्राची सुरुवात प्रार्थनेने झाली. त्यानंतर सूक्ष्म व्यायाम, ग्रीवा चालन, कटी चालन आणि घुटना संचलन यांचा सराव करण्यात आला. पुढे सहभागींनी विविध आसनांचा उत्साहाने अभ्यास केला. समारोप सत्रात कपालभाती, नाडीशोधन, अनुलोम-विलोम आणि भ्रामरी प्राणायामासह ध्यान प्रक्रियेचा सराव करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता ॐ सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे सन्तु निरामयाः या विश्वकल्याणाच्या मंगल प्रार्थनेने झाली.

यावेळी उपस्थितांनी नियमित योगाभ्यासाचा संकल्प करत निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला. वैयक्तिक आरोग्य, मानसिक संतुलन आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी योग ही काळाची गरज असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### आरटीआय नियम 2026 विरोधात पुरंदरमधील माहिती अधिकार कार्यकर्ते आक्रमक

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाने १२ जून २०२६ पासून लागू केलेल्या महाराष्ट्र माहिती अधिकार (आरटीआय) नियम २०२६ विरोधात पुरंदर तालुक्यातील माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ पुरंदर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी पुरंदर तहसील कार्यालयात नव्या नियमांना तात्काळ स्थगिती देण्याची अथवा ते रद्द करण्याची मागणी केली. या संदर्भातील निवेदन मुख्यमंत्री, मुख्य माहिती आयुक्त, केंद्रीय माहिती आयोग यांना मेल करून पाठवण्यात आले. तसेच तालुका स्तरावर आमदार, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. त्याच वेळी मुबई येथील आजाद मैदानावर होणाऱ्या एकदिवशीय आंदोलनात सहभागी होण्यासाठी जाण्याचे नियोजन हीं करण्यात आले. या वेळी माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन, पुरंदर तालुक्यातील एस. डी भोसले, कुंडलिक भोसले, नंदकिशोर कामठे, बाळासाहेब लेंडे, अविनाश जाधव, नवनाथ फडतरे, योगेश पवार, ए. टी. माने, उदय गायकवाड व इतर जेष्ठ नागरिकानी निवेदन दिले.

### टँकरमध्ये पाणी भरतानाच हजारो लिटर पाणी वाया; नागरिकांना मात्र करावी लागते वणवण

हडपसर (दैनिक संध्या) : रामटेकडी येथील टँकर पॉईंटवर दररोज सुमारे ४०० टँकर भरून जातात. ते भरताना हजारो लिटर पाणी वाया जाते. मागणीनुसार टँकर येथून दिले जातात. मात्र ते सारेच टँकर नागरिकांपर्यंत पोहोचत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जाते. त्यामुळेच तब्बल ४०० टँकर भरून गेल्यानंतरही नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. त्यावरूनच टँकरच्या वितरणात गौडबंगाल असल्याची शक्यता नागरिक व्यक्त करत आहेत. अनेक टँकरसाठी नगरसेवकांच्या कार्यालयातून फोन येतात. त्यामुळे मागणीनुसार टँकर द्यावे लागतात. ज्या परिसरातून मागणी येते, तिकडे टँकर दिले जातात. मात्र नगरसेवकांकडून मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने जेथे गरज आहे त्या परिसरात टँकर कमी पोहोचतात, तर काही टँकर हे परस्पर विकले जातात. टँकर घेऊन गेल्यावर ज्या सोसायटीत टँकर रिकामा केला जातो, त्याच्याकडून चलन आणले जाते. चलन कोणाचे आणले, त्याची पडताळणी होत नाही. एका सोसायटीतील दोन-चार लोक वेगवेगळ्या नगरसेवकांकडे जाऊन टँकरची मागणी करतात. आपल्या प्रभागात असल्याने ते नगरसेवकही टँकरची व्यवस्था करतात. टँकर पॉईंटवरील अधिकाऱ्यांना फोन करून संबंधित एकाच सोसायटीत टँकर टाकायला चार नगरसेवक सांगतात. त्यामुळे त्या सोसायटीचे चांगलेच फावते. त्यामुळे चारचा प्रभाग सोसायटीधारकांना फायदेशीर ठरत आहे. सोसायटीच्या या हुशारीमुळे पाणी मिळवणे किती सोपे आहे, हे दिसते.

### बारामती एमआयडीसी परिसरात उघड्यावर कचरा न टाकण्याचे आवाहन


बारामती (दैनिक संध्या) : एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील आणि मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या निर्देशानुसार एमआयडीसी परिसरात उघड्यावर कचरा टाकताना आढळून आलेल्या नागरिकावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. 'स्वच्छ बारामती-सुंदर बारामती' या संकल्पनेला पुढे नेण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे तसेच शहर कचरामुक्त ठेवण्यास हातभार लावावा, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले आहे. श्री. पाटील म्हणाले, एमआयडीसी परिसर स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी नगरपरिषदेच्या मार्शल पथकाकडून नियमित पाहणी करण्यात येत आहे. यावेळी नागरिक, व्यापारी व उद्योजकांनी कचरा निर्धारित ठिकाणीच टाकावा, उघड्यावर कचरा टाकून परिसर अस्वच्छ करू नये, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले आहे. शहरात उघड्यावर कचरा टाकणे, रस्त्याच्या कडेला कचरा फेकणे, सार्वजनिक ठिकाणी घाण करणे अशा प्रकारच्या नियमभंग करणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत एकूण २ हजार ७०० दंड पावत्या करण्यात आल्या असून संबंधितांकडून दंड वसूल करण्यात आला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना गुन्ह्याच्या स्वरूपानुसार १०० ते ५०० रुपयापर्यंत दंड आकारण्यात येत आहे. नागरिकांनी घरातील ओला व सुका कचरा वेगळा करून घंटागाडीमध्येच द्यावा. सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्याच्या कडेला कचरा टाकू नये. शहर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून सहकार्य करावे, असे आवाहन श्री. भुसे यांनी केले आहे.

# हरित कडेपठार उपक्रमात एक हजार देशी वृक्षांची लागवड

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र शासनाच्या वन विभाग व श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला "हरित कडेपठार उपक्रम २०२६" उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. "एक पाऊल निसर्ग संवर्धनाकडे" या संकल्पनेतून अरण्यषष्ठीचा योग साधून कडेपठार परिसर हिरवागार करण्याच्या उद्देशाने एक हजार देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.

या अभियानात जेजुरी कडेपठार परिसर, पायरी मार्ग, येथे वृक्षारोपणावेळी नागरिक, सामाजिक संस्था, युवक व पर्यावरणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रमदान केले. वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची शपथ घेऊन पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास हिवरे बाजारचे सरपंच तथा आदर्श गाव कार्यक्रमाचे कार्यकारी संचालक पोपटराव पवार उपस्थित होते. त्यांनी पर्यावरण





संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी असे आवाहन केले.

कार्यक्रमात सयाद्री देवराई प्रतिष्ठानचे संस्थापक तसेच प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिन्दे यांनी देखील व्हिडीओ कॉल द्वारे उपस्थितांशी संवाद साधला.

याप्रसंगी पुरंदरचे वनपरिक्षेत्र अधिकारी सागर ढोले, देवराई फाउंडेशनचे रघुनाथ ढोले,पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका ऐश्वर्या पठारे,पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या रुपाली झेंडे म्हाळसाकांत जेजुरीकर प्रमुख विश्वस्त खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट जेजुरी विश्वस्त मयुर दिडभाई , श्री मार्तंड देवसंस्थान चे विश्वस्त डॉ राजेंद्र खेडेकर, व्यसन मुक्त युवक संघाचे आनंद नाईक उपस्थित होते. या उपक्रमात महाराष्ट्र शासनाचा वन विभाग, श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी नगरपरिषद, श्री लकडी पुल विठ्ठल मंदिर ट्रस्ट पुणे, स्वामी मल्हार प्रतिष्ठान, सृष्टी सृजन फाउंडेशन, जेजुरी सेवा संघ, निसर्गात खारीचा वाटा ग्रुप, श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट, सखी प्रेरणामंच, उघडा मारुती मित्र मंडळ जेजुरी, व्यसनमुक्त युवक संघ महाराष्ट्र (पुरंदर तालुका), पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यालय जेजुरी, जिजामाता हायस्कूल, जेजुरी, महाराष्ट्र राज्य महावितरण, जेजुरी तसेच समस्त ग्रामस्थ, खांदेकरी व मानकरी ट्रस्ट जेजुरी या संघटनांनी सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड मंगेश जेजुरीकर यांनी केले होते.

## भीमा नदीपात्र कोरडे; वढू येथील पाणीपुरवठा बंद, वाघोलीत दयनीय अवस्था

**वाघोली (दै. संध्या)**

पावसाने अद्याप हजेरी न लावल्याने आणि भीमा नदीचे पात्र कोरडे पडल्याने वढू येथील पाणीपुरवठा यंत्रणा बंद पडली आहे. त्यामुळे वाघोलीकरांवर पाणीटंचाईचे मोठे संकट ओढवले असून, अनेक भागांमध्ये नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. दैनंदिन जीवन विस्कळीत झाल्याने पुणे महापालिकेने तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



वाघोलीला वढू येथील धरणातून ग्रामपंचायतीच्या काळात उभारण्यात आलेल्या जलवाहिनीद्वारे दररोज सुमारे पाच एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. मात्र भीमा नदीचे पात्र कोरडे पडल्याने धरणातील पाणीसाठ्यावर परिणाम झाला असून, पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. परिणामी अनेक भागांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

वाघोलीचा पुणे महापालिकेत समावेश होऊन तीन वर्षांहून अधिक कालावधी लोटला असला तरी वाघोलीकरांकडून मोठ्या स्वरूपात कर वसूल करूनही अपेक्षित नागरी सुविधा अद्याप उपलब्ध झालेल्या नाहीत.

त्यातच जून महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेवक रामदास दाभाडे यांनी केली आहे. नागरिकांमधूनही महापालिकेने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## चाकण बाजारात गाजराची भरपूर आवक

**चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये कैरी, गाजर, हिरवी मिरची, चवळी, टोमॅटो व दोडक्याची भरपूर आवक झाली. आद्रक, वाटाणा, काकडी व शेवगा यांचे भाव गडगडले आहेत. फळभाज्या व पालेभाज्यांचे भाव कोसळले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ९० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ७०० ते २,४०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,६०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,५०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाला १५ हजार रुपये कमाल भाव मिळाला.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३१० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयां- पासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :
कांदा - एकूण आवक - १,००० क्विंटल. भाव क्रमांक - १.२,४०० रुपये, भाव क्रमांक २.१,७०० रुपये, भाव क्रमांक ३.७००.
बटाटा - एकूण आवक - १,६०० क्विंटल.भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,१०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

## 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारणाची कामे गतीने पूर्ण करा - पापळकर

**पुणे (दै. संध्या)**

'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविण्याच्यादृष्टीने मृद व जलसंधारण उपचारांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे; जिल्ह्यातील भूजल पातळी वाढीकरिता महत्त्वपूर्ण असलेली ही कामे दर्जेदार पद्धतीने आणि गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांनी दिले.

सचिव श्री. पापळकर यांनी पुणे जिल्ह्यातील वाघापूर, गुरोळी, साकुर्डे आदी गावात सुरु असलेल्या पाझर तलाव दुरुस्ती, नाला खोलीकरण, सिमेंट नाला बांध, आदी कामांची पाहणी केली. यावेळी जलसंधारण विभागाचे मुख्य अभियंता नितीन दुसाने, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर रणदिवे, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी चेतन कलशेट्टी, कार्यकारी अभियंता दिपक लांडगे, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गौरव बोरकर आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. पापळकर म्हणाले, जलसंधारण ही काळाची गरज असून, पाण्याच्या दुर्भिक्ष्यावर मात करण्यासाठी मृद व जलसंधारणाची अधिकाधिक कामे हाती घ्यावीत. गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार आणि जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून जलसंवर्धनाची कामे




करावीत. लोकसहभागाद्वारे गाळ काढण्याच्या व नाला खोलीकरणाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे.

यावेळी नागरिकांशी संवाद साधताना श्री. पापळकर यांनी आवाहन केले, उपलब्ध पाण्याचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घेऊन पाण्याचा काटकसरीने वापर करावा, पावसाळ्यातील पाण्याचा साठा करुन त्याचे सूक्ष्म नियोजन करुन वापर करावा.

श्री. पापळकर यांनी मृद व जलसंधारण योजनांच्या अंमलबजावणीबाबत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा कार्यालयात आढावा बैठक घेतली. यावेळी जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण वाढविणे आणि भविष्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण- गाळयुक्त शिवार योजना तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत मृद व जलसंधारणाची कामे हाती घेण्याबरोबरच नवीन कामांचे प्रस्ताव सादर करावेत. अतिशोषित, टँकरग्रस्त गावांमध्ये भूजल पातळी वाढवण्यासाठीची कामे कमी कालावधीमध्ये पूर्ण करावीत, अशा सूचना श्री. पापळकर यांनी दिल्या.

यावेळी विभागाचे उप अभियंता सागर भोर, सुयश महाडीक, ओमकार शेरकर आणि सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकारी आदी उपस्थित होते.

# ‘निरोगी वृद्धत्वासाठी योग’ला ५ हजार नागरिकांचा प्रतिसाद

### महापौर मंजुषाताई नागपुरे यांच्या आवाहनाला पुणेकरांचा भरभरून प्रतिसाद

**पुणे (दै. संध्या)**

माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या प्रेरणेतून आणि माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पुणे महानगरपालिका व जिल्हा प्रशासन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या “Yoga for Healthy Ageing” (निरोगी वृद्धत्वासाठी योग) या संकल्पनेवर आधारित आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत सुमारे ५ हजार पुणेकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

महापौर मंजुषाताई नागपुरे म्हणाल्या की, योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून आज संपूर्ण जगाने तिचा स्वीकार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र महासभेत मांडलेल्या संकल्पनेमुळे योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आणि भारताच्या प्राचीन संस्कृतीचा गौरव जगभर पोहोचला. योग हा केवळ व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांना जोडणारा जीवनमार्ग आहे.

यावर्षीची “निरोगी वृद्धत्वासाठी योग” ही संकल्पना विशेष महत्त्वपूर्ण असून वाढत्या वयानुसार आरोग्य उत्तम राखणे, मानसिक स्वास्थ्य बळकट करणे, शारीरिक क्षमता टिकवून ठेवणे आणि ज्येष्ठ नागरिकांना अधिक सक्रिय व आत्मनिर्भर जीवन जगण्यास सक्षम करणे यासाठी योग अत्यंत प्रभावी माध्यम ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास मा. खासदार मेधाताई कुलकर्णी, उपमहापौर श्री. परशुराम वाडेकर, मा. आमदार श्री. हेमंत रासणे, पुणे शहराध्यक्ष श्री. धीरज घाटे, अतिरिक्त आयुक्त श्री. ओमप्रकाश दिवटे, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती ज्योती कदम, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव श्री. संजय शेटे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. जगन्नाथ लकडे, उपायुक्त श्री. माधव जगताप, उपायुक्त डॉ. संतोष टेंगले, डबल महाराष्ट्र केसरी श्री. शिवराज राक्षे, शिवछत्रपती पुरस्कारार्थी श्रीमती सोनाली गारगोटे, श्रीमती रेश्मा पुणे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रार्थनेने कार्यक्रमास प्रारंभ झाला. मुख्य योग प्रशिक्षक श्रीमती मनाली देव यांच्या मार्गदर्शनाखाली ६० योग प्रशिक्षकांनी सामूहिक योग प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले. सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत आयोजित अधिकृत



सामूहिक योग सत्रात विद्यार्थी, खेळाडू, शिक्षक, युवक-युवती, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि क्रीडाप्रेमींनी उत्साहाने सहभाग घेतला.

यावेळी महापौर मंजुषाताई नागपुरे यांनी उपस्थित नागरिकांचे अभिनंदन करून योगाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता पसायदान व प्रार्थनेने करण्यात आली.

पुणे महानगरपालिका व जिल्हा प्रशासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्ह्यातील अनेक शाळा, महाविद्यालये, सेवाभावी संस्था, योग केंद्रे, क्रीडा मंडळे, युवक व महिला मंडळांनी विविध ठिकाणी योग सत्रांचे आयोजन केले.

“निरोगी समाज, सुदृढ कुटुंब आणि सक्षम राष्ट्रनिर्मितीसाठी प्रत्येक नागरिकाने नियमित योगाभ्यास करणे आवश्यक आहे. ‘करा योग – रहा निरोग’ हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवू या आणि निरोगी भारताच्या निर्मितीत आपले योगदान देऊ या,” असे आवाहन महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांनी केले.

